गुरुवार, ७ ऑक्टोबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक ८०
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## रेल्वे कर्मचाऱ्यांना केंद्राकडून दिवाळी बोनस मंजूर

**नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्रिमंडळाने रेल्वे कर्मचाऱ्यांना खूशखबर दिली आहे. रेल्वेतील राजपत्रित अधिकारी वगळता इतर कर्मचाऱ्यांना ७८ दिवसांच्या पगाराएवढा उत्पादकतेवर आधारित बोनस मंजूर करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी ही माहिती दिली. सुमारे ११.५६ लाख नॉन-गॅझेटेड रेल्वे कर्मचाऱ्यांना याचा फायदा होणार आहे. मंत्रिमंडळाच्या बुधवारी (दि. ६) झालेल्या बैठकीत दोन विभागांबाबत निर्णय घेण्यात आले. रेल्वेच्या नॉन-गॅझेटेड कर्मचाऱ्यांना वर्षानुवर्षे प्रोडक्टिव्हिटी लिंक बोनस मिळतो. या वर्षीही या कर्मचाऱ्यांना ७८ दिवसांचा बोनस दिला जाणार आहे. याशिवाय पीएम मित्र योजना सुरू केली जाणार असून ही योजना कापड आणि वस्त्रांच्या क्षेत्रात मोठे योगदान देईल. यामुळे लाखो नागरिकांना रोजगार मिळेल, असे मंत्री ठाकूर यांनी सांगितले.

**अंतरंग**

मंत्रिपद गेलं चुलीत, उद्या राजीनामा देतो! -बच्चू कडू/२

राजिप प्रशासनाचे आदिवासी, धनगर बांधवांनी घातले श्राद्ध/५

रायगडातील जलतरणपटू, प्रशिक्षकाची निवड/६

# परतीच्या पावसाचे धूमशान

## रायगडात मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह पर्जन्यवृष्टी

**अलिबाग : प्रतिनिधी**

मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू झाला असून रायगड जिल्ह्यासाठी हवामान खात्याने जारी केलेल्या यलो अलर्टनुसार बुधवारी (दि. ६) सलग दुसऱ्या दिवशी विजांचा कडकडाट व ढगांच्या गडगडाटासह जोरदार पाऊस पडला. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाल्याचे दिसून आले.

रायगड जिल्ह्यात ५ ते ८ ऑक्टोबर या कालावधीत काही ठिकाणी विजांचा कडकडाट व ढगांच्या गडगडाटासह जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तविला होता. त्यामुळे जिल्हा प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला होता. त्यानुसार बुधवारी सायंकाळी जोरदार पर्जन्यवृष्टी झाली. सोबतच विजांचा कडकडाट आणि ढगांचा गडगडात होत असल्याने कामावरून परतणाऱ्या लोकांची तारांबळ उडाली.

जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पाऊस पडत आहे. पाऊस आल्यावर वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. विशेषतः सायंकाळच्या सुमारास लाईट गेल्यावर महिला, मुले, वृद्ध मंडळी अस्वस्थ होऊन जातात.



## सकाळी गारवा, दुपारी ऊन, सायंकाळी पाऊस

**म्हसळा :** हल्ली सकाळी ९ नंतर कमालीचे उष्णतामान वाढले आहे. दुपारी कडक ऊन पडते, तर सायंकाळी काही ठिकाणी जोरदार पाऊस पडत आहे. या पावसामुळे भातपीक धोक्यात आले आहे.

राज्यात चार-पाच दिवस पाऊस पडण्याची शक्यता असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. ही शक्यता प्रत्यक्षात आली असून पावसामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. असाच पाऊस पडत राहिल्यास भातपिकाचे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. बहुतांश शेतकरी हल्ली फार महाग व सुधारित अशा संकरित जातीची बियाणी लागवडीसाठी वापरतात. दिवसा ऊन व सायंकाळी पाऊस पडत असल्याने पिकातील दाणा ठिसूळ होतो. त्यामुळे तांदळाला उतारा कमी होतो. परिणामी शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते.

# जि. प. पोटनिवडणुकीत देशमुख, गावितांना धक्का

## भाजपची मुसंडी; धुळ्यातही विजय

**नागपूर, पालघर, धुळे : प्रतिनिधी**

राज्यातील जिल्हा परिषद पोटनिवडणुकांचे निकाल बुधवारी (दि. ६) लागत असताना अनेक ठिकाणी सत्ताधाऱ्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. नागपूरमध्ये राज्याचे माजी गृहमंत्री व राष्ट्रवादीचे नेते अनिल देशमुख आणि पालघरमध्ये शिवसेना नेते खासदार राजेंद्र गावित यांना धक्का बसला आहे. देशमुख यांच्या ताब्यातील नगरखेडा पंचायत समितीवर भाजपने विजय मिळवला, तर गावित यांच्या मुलाचा जि. प. पोटनिवडणुकीत पराभव होऊन भाजपने बाजी मारली. दरम्यान, धुळे जि. प. आणि पं. स.मध्ये भाजपने विजय मिळवित सत्ता कायम राखली आहे.

राज्यात सत्तेवर असताना आणि महाविकास आघाडीच्या रूपात तिन्ही पक्ष एकत्र असल्याने ताकद वाढलेल्या स्थितीतही राष्ट्रवादी काँग्रेसला नगरखेडा पंचायत समितीतील सत्ता टिकवता आलेली नाही. येथे भाजपने विजय मिळवल्याने हा देशमुख यांना धक्का मानला जात आहे.

दुसरीकडे गेल्या आठ वर्षांपासून पालघरचा गड आपल्या ताब्यात ठेवणाऱ्या खासदार राजेंद्र गावित यांना आपल्याच मुलाला तिथून निवडून आणण्यात अपयश आले आहे. पालघर जि. प. पोटनिवडणुकीत डहाणू तालुक्याच्या वणई गटामधून राजेंद्र गावित यांचा मुलगा रोहित यांना उमेदवारी देण्यात आली होती. गावित यांचे पालघरमधील प्रस्थ सर्वश्रुत असल्यामुळे रोहित यांचा विजय निश्चित मानला जात होता, मात्र त्यांना अनपेक्षितपणे पराभवाचा सामना करावा लागला आहे. भाजपचे उमेदवार पंकज कोरे यांनी रोहित यांचा पराभव करीत एक प्रकारे राजेंद्र गावितांनाच पराभूत केल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.



*या निवडणुकीत भाजपने निर्णय घेतला होता की, आमचे स्थानिक नेतृत्व ही निवडणूक लढेल. आम्ही कुणीही प्रचाराला गेलो नाही. तरी जनतेने सर्वांत मोठा पक्ष म्हणून भाजपला निवडून दिले आहे. २२५ जागांपैकी ५५ जागा म्हणजे २५ टक्के जागा भाजपला मिळाल्या आहेत. २५ टक्के जागा अपक्ष आणि इतरांना मिळाल्या आणि तीन पक्ष एकत्र येऊनही उरलेल्या ५० टक्क्यांत ते अडकले आहेत.*

***-देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा***



उलवे नोड : रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या व्यवस्थापन समितीची नियमित सभा मंगळवारी संस्थापक लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेला जनरल सेक्रेटरी वाय. टी. देशमुख, सदस्य रवींद्र बाळकृष्ण भगत, भार्गव रामदास ठाकूर, मनोहर लक्ष्मण ओवळेकर, शिवशंकर सुमन, स्वप्नील अरुण ठाकूर, प्रतीक भरत ठाकूर, अभिजित उत्तमराव जाधव, भूषण श्रीधर ठाकूर आणि विशेष निमंत्रित डॉ. एस. टी. गडदे व अमोघ प्रशांत ठाकूर उपस्थित होते.

## उठा उठा मंत्रालयात जायची वेळ झाली!

### मनसेची मुख्यमंत्र्यांवर टीका



**मुंबई : प्रतिनिधी**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लावण्यात आलेल्या लॉकडाऊननंतर जवळपास दीड वर्षाहून अधिक काळानंतर राज्यभरातील सर्व शाळा सोमवार (दि. ४)पासून पुन्हा सुरू झाल्या आहेत. दरम्यान, यावरून आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे.

उठा उठा शाळा चालू झाली आता मंत्रालयातसुद्धा जायची वेळ झाली, असा टोला मनसेचे सरचिटणीस संदीप देशपांडे यांनी ट्विटरच्या माध्यमातून लगावला आहे. यापूर्वीही अनेकदा कोरोना काळात मंत्रालयात न जाता मुख्यमंत्र्यांनी केलेल्या 'वर्क फ्रॉम होम'मुळे भाजप आणि मनसेने टीका केलेली आहे.

## जावयावरील कारवाईमुळे नवाब मलिक यांना भाजपविरोधात पोटशूळ

### विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकरांचे प्रत्युत्तर

**मुंबई : प्रतिनिधी**

ड्रग्ज प्रकरणात अमली पदार्थविरोधी विभागाने (एनसीबी) क्रूझवर केलेल्या छापेमारीच्या कारवाईवर राष्ट्रवादी काँग्रेसने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. शाहरूखचा मुलगा आर्यनसोबत फोटो व्हायरल झालेली व्यक्ती मनीष भानुशाली असून तो भाजपशी संबंधित असल्याचा आरोप राष्ट्रवादीचे प्रवक्ते नवाब मलिक यांनी केला आहे. त्यावर आता विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी उत्तर दिले आहे.

मनीष भानुशालीबद्दल माहिती नाही. त्याला भेटल्याचे मला तरी आठवत नाही. याबाबत एनसीबी कार्यालय खुलासा करेल. कोणाला पाठीशी घालायचे कारण नाही.



नवाब मलिक यांच्या जावयावर झालेली कारवाई अजून त्यांच्या पचनी पडलेली नाही. तो पोटशूळ त्यांच्या वक्तव्यातून दिसतोय, असे प्रवीण दरेकर या वेळी म्हणाले.

असे कधीच या देशात झालेले नाही. सीबीआयची कारवाई झाली की सीबीआय, ईडीवर बोलायचे. आता एनसीबीची कारवाई झाल्यावर तसेच चित्र उभे करायचा प्रयत्न होतोय, असेही दरेकर यांनी सांगितले.

*मुंबईत ड्रग्ज पार्टी होणार असल्याची मला माहिती मिळाली होती. ही माहिती मी एनसीबीच्या अधिकाऱ्यांना दिली. सगळी कारवाई एनसीबीने केली. मी सोबत चाललो होतो. आम्हाला जी माहिती मिळाली होती ती साक्षी नोंदवायची असल्याने आम्ही गेलो होतो. देशहिताचे जे काम आहे ते आम्ही केले. नवाब मलिक जे आरोप करीत आहेत त्यात तथ्य नाही. भाजपमध्ये माझ्याकडे कुठलेही पद नाही. मी सामान्य कार्यकर्ता आहे. के. पी. गोसावी कोण आहेत ते मला माहीत नाही.*

**-मनीष भानुशाली**

## मुंबईच्या डोंगरीतून १५ कोटींचे हेरॉईन जप्त

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय अमली पदार्थविरोधी पथकाने म्हणजेच एनसीबीने २ ऑक्टोबरपासून सुरू केलेल्या धाडींचे सत्र सुरूच असून बुधवारी (दि. ६) मुंबईतील डोंगरी भागामध्ये टाकलेल्या एका छाप्यात एनसीबीने दोन जणांना अटक केली असून त्यांच्याकडून सात किलो ड्रग्ज जप्त करण्यात आले आहेत.

एएनआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, अमली पदार्थविरोधी पथकाच्या मुंबईमधील तुकडीने सात किलो हेरॉईनसह दोन जणांना ताब्यात घेतले आहे. मुंबईमधील डोंगरी भागात ही कारवाई करण्यात आली असून ताब्यात घेण्यात आलेल्या हेरॉईनची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये १५ कोटी रुपये इतकी आहे.

## राष्ट्रवादी-शेकाप आघाडीच्या चर्चेने कर्जतमध्ये शिवसेनेचा स्वबळाचा नारा

**कर्जत : बातमीदार**

कर्जत पंचायत समितीत बहुमत असतानाही शिवसेनेकडून उपसभापती पदावर शेतकरी कामगार पक्षाला संधी देण्यात आली. तेव्हापासून शिवसेना आणि शेकाप हे पक्ष आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत एकत्र लढणार असे राजकीय वर्तुळात बोलले जात होते, मात्र काही दिवसांपूर्वी जिल्ह्याच्या राजकारणात जोरदार हालचाली घडल्या आहेत. त्यातून राष्ट्रवादी काँग्रेस आणि शेकाप हे पक्ष एकत्र राहणार असे संकेत देण्यात येत आहेत. त्यामुळे आगामी निवडणुकांसाठी शिवसेना आता स्वबळाचा नारा देऊ लागलीय.

कर्जत विधानसभा मतदारसंघात शेकापने आपल्याला मदत केली आणि त्यामुळे आपण शेकापला पंचायत समितीमध्ये उपसभापतीपद दिले, असे जाहीर वक्तव्य कर्जतचे शिवसेना आमदार महेंद्र थोरवे यांनी याच आठवड्यात झालेल्या शिवसैनिकांच्या बैठकीत केले. त्यामुळे कर्जत तालुक्यात शिवसेना आणि शेकाप यांची आघाडी होणार हे जवळपास निश्चित झाले होते.

दरम्यान, शिवसेना नेते व माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावरील टीकेनंतर आमदार महेंद्र थोरवे यांनी राष्ट्रवादीबरोबर आघाडी राज्यात आहे, जिल्ह्यात नको यासाठी जिल्ह्यातील अन्य तालुक्यात जाऊन सभा घेण्यास सुरुवात केली, परंतु जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीनंतर पुन्हा एकदा राष्ट्रवादी आणि शिवसेना या राज्य सरकारमधील मित्रपक्षांना जनतेला दाखवण्यासाठी एकत्र यावे लागले, मात्र कर्जत येथे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने एकत्र आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसने पुढाकार घेऊन शेकापच्या नेत्यांशी चर्चा केली. त्या गुप्त बैठकीत हे दोन पक्ष आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक एकत्र लढणार असल्याचे स्पष्ट झाले असून तसे संकेत उभय पक्षांच्या नेत्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना दिले आहेत. त्यामुळे कर्जत विधानसभा मतदारसंघात शिवसेनेने आता 'एकला चलो रे'चा पवित्रा घेतला आहे.

### आघाडीतील कार्यकर्ते संभ्रमात

राज्यातील सत्ताधारी महाविकास आघाडीत शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस हे तीन प्रमुख पक्ष आहेत, मात्र या पक्षांच्या नेत्यांमध्ये अधूनमधून कुरबुरी होत असतात. त्यातून खटके उडतात, वादविवाद होतात. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये वारंवार संभ्रम निर्माण होत असतो. त्यातच स्थानिक पातळीवर कधी या पक्षाशी आघाडी, तर कधी त्याला सोडून दुसऱ्या पक्षाशी जुळवून घेतले जात असल्याने आम्ही नक्की कोणती भूमिका घ्यायची, अशी तक्रारवजा कुजबूज आघाडीतील कार्यकर्त्यांमध्ये आहे.

## निवडक

### विमानतळावरील ड्राम्यानंतर राहुल गांधी लखीमपूरकडे

**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशातील लखीमपूर खेरी येथे पीडित शेतकऱ्यांच्या भेटीसाठी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या काँग्रेसच्या शिष्टमंडळाला लखनऊ विमानतळावर थांबविण्यात आले होते. या ठिकाणी काही काळ ड्रामा झाल्यानंतर त्यांना पुढे जाण्यास परवानगी देण्यात आली. त्यानंतर ते लखीमपूरकडे रवाना झाले.

### गोंदियात नक्षलवाद्यांविरोधात कारवाई; स्फोटके केली जप्त

**गोंदिया :** जिल्हा पोलीस विभागाच्या वतीने केशोरी पोलीस ठाणे अंतर्गत येत असलेल्या भरनोली आऊटपोस्टमधील आंबेझरी ते नागणडोह मार्गावरील जंगलात नक्षलवाद्यांनी पुरून ठेवलेल्या स्फोटकांचा साठा शोध घेत जप्त केला आहे. पोलीस उपमहानिरीक्षक संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पोलिसांनी बुधवारी (दि. ६) ही मोहीम राबवली.

## तळोजातील दफनभूमी, स्मशानभूमी पनवेल महापालिकेकडे हस्तांतरित

### सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केली पाहणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिडकोकडील विविध सेवा पनवेल महापालिकेकडे हस्तांतरित करण्याच्या कामाला वेग आला आहे. त्यानुसार सिडकोकडून तळोजा येथील दफनभूमी आणि स्मशानभूमी कामकाज महापालिकेकडे हस्तांतरित झाले आहे. महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी बुधवारी (दि. ६) या स्मशानभूमी आणि दफनभूमींची अधिकाऱ्यांसह पाहणी केली.

या पाहणी दौऱ्यात भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, नगरसेवक हरेश केणी, भाजप नेते निर्दोष केणी, वासुदेव पाटील, महिला मोर्चा अध्यक्ष आशा बोरसे, मजित फाय, रिया गामदुले, नासिर शेख यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

मुस्लीम बंधूंना सर्व सुविधायुक्त दफनभूमी लवकरात लवकर मिळावी व त्या संदर्भातील कामे त्वरित करण्याबाबतचे आदेश या वेळी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी अधिकाऱ्यांना दिले.



# मंत्रिपद गेलं चुलीत, उद्या राजीनामा देतो!

## ▌राज्यमंत्री बच्चू कडू आमदार अमोल मिटकरींवर संतापले

**अकोला : प्रतिनिधी**

अकोला जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांच्या गावात राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या प्रहार पक्षाने राष्ट्रवादीचा पराभव केला आहे. यावरून मिटकरी आणि कडू यांच्यात वाद पेटला आहे.



गावातील पराभव मिटकरींच्या जिव्हारी लागला आहे. याबाबत एका वृत्तवाहिनीशी बोलताना ते म्हणाले, सर्वच पक्षांनी पोटनिवडणुकीच्या माध्यमातून आत्मचिंतन करावे. कुरघोडीचे राजकारण करू नये. महाविकास आघाडी एकत्र आली नाही तर महापालिकेच्या निवडणुकांमध्ये अपयश येऊ शकते हे सर्वांनी लक्षात ठेवावे. बच्चू कडू हे शेतकरी नेते आहेत. त्यांनी भाजपसोबत आतून आघाडी केली. मग ते महाविकास आघाडीचे मंत्री असताना त्यांनी असे का केले? यानंतर राज्यमंत्री कडू यांनी आमदार मिटकरींवर जोरदार प्रहार केला. मिटकरी हा मोठा माणूस आहे. मी त्याच्याबाबत बोलू शकत नाही. मी आमिषाला बळी पडणारी औलाद नाही. ही माझी संस्कृती नाही. असे काही असेल तर मिटकरींनी सिद्ध करावे. हवेत आरोप कोणीही करू शकतात. मिटकरी हे बरोबर नाही. हे मी सहन नाही करणार. चुलीत गेले ते मंत्रिपद. आमिषाला बळी पडणे म्हणजे काय असते ते मला आधी सांगा. राष्ट्रवादी, शिवसेना, भाजप सर्वच पक्ष वेगवेगळे लढले आहेत. मी कुठल्या आमिषाला बळी पडलो ते सिद्ध करा. मी उद्या राजीनामा देऊन फेकतो. मला त्याची गरज नाही, असे बच्चू कडू म्हणाले.

### जि. प. पोटनिवडणुकीतही भाजप अव्वल –चंद्रकांत पाटील

**मुंबई :** राज्यातील सहा जिल्हा परिषदा आणि ३८ पंचायत समित्यांमधील रिक्त पदांसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपला राज्यातील प्रमुख राजकीय पक्षांमध्ये सर्वाधिक जागा मिळाल्या असून त्याबद्दल आपण मतदारांचे आभार मानतो आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन करतो, अशी प्रतिक्रिया भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी बुधवारी (दि. ६) व्यक्त केली.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, या निवडणुकीत राज्यातील सत्ताधारी महाविकास आघाडीच्या शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस या घटक पक्षांनी सत्तेचा पुरेपूर वापर केला तरीही मतदारांनी भाजपला पहिली पसंती दिली आहे. २०१४ ते २०१९ या कालावधीत राज्यात सत्तेवर असताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात भाजपा पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरला होता व भाजप विरोधी पक्ष असला तरीही तोच ट्रेंड आज कायम राहिला आहे.



## आमदार महेश बालदी यांची नागरी सुविधांसाठी सिडको प्रशासनासोबत चर्चा

**उरण : रामप्रहर वृत्त**

नव्याने विकसित होत असलेल्या उलवे नोड, करंजाडे, वडघर, चिंचपाडा, येथे मोठ्या प्रमाणाने नागरीकरण होत असल्याने येथील नागरिकांना सुख सोयी होणे गरजेचे आहे. त्यानुसार नोड विकसित करणे तसेच स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या विविध विषयांबाबत उरण मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांनी सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक अश्विन मुदगल यांच्यासोबत सोमवारी (दि. ४) चर्चा केली.

आमदार महेश बादली यांच्या माध्यमातून मतदार संघाच्या विकासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. उलवे नोड, करंजाडे, वडघर, चिंचपाडा, येथे सुख सोयींसंदर्भात झालेल्या सिडकोसोबतच्या बैठकीत सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक अश्विन मुदगल यांनी लवकरात लवकर सर्व प्रश्न मार्गी लावणार असल्याचे मान्य केले.

या चर्चेच्या या वेळी उलवे नोड १ अध्यक्ष मदन पाटील, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, भाजप उलवे नोड उपाध्यक्ष शैलेश भगत, युवा मोर्चा उलवे नोड अध्यक्ष निलेश खारकर, उपाध्यक्ष धीरज ओवळेकर, भाजपचे ज्येष्ठ नेते मनोहर ओवळेकर, वहाळ ग्रापमपंचायत सदस्य रितेश म्हात्रे यांच्यासह पदधिकारी उपस्थित होते.

## देवेंद्र फडणवीसांचा आज आठ लाख भाजप कार्यकर्त्यांशी ऑनलाइन संवाद

### सेवा समर्पण अभियानानिमित्त होणार कार्यक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

माजी मुख्यमंत्री व विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस हे गुरुवारी (दि. ७) भारतीय जनता पक्षाच्या राज्यभरातील शक्ती केंद्र प्रमुख, बूथ प्रमुख व बूथ समिती सदस्य म्हणून काम करणाऱ्या सुमारे आठ लाख कार्यकर्त्यांशी ऑनलाइन संवाद साधणार आहेत. भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.

उपाध्ये यांनी पत्रकात म्हटले आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्षाने संघटनात्मक रचना अधिक बळकट करण्याचा संकल्प केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून राज्यभरातील बूथ समित्यांची, शक्ती केंद्रांची रचना पूर्ण केली जात आहे. भारतीय जनता पक्षातर्फे सध्या समर्थ बूथ अभियान व सेवा–समर्पण अभियानानिमित्त राज्यभर वेगवेगळे कार्यक्रम होत आहेत. या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस हे शक्ती केंद्र व बूथ समिती प्रमुख तसेच बूथ समिती सदस्य म्हणून कार्यरत असणाऱ्या पक्षाच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. पक्षाच्या संघटनात्मक कार्यक्रमांचा आढावाही देवेंद्र फडणवीस या वेळी घेणार आहेत.

एखाद्या राजकीय पक्षाच्या प्रमुख नेत्याने एकाच वेळी आठ लाख कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याचा विक्रम या संवादाच्या माध्यमातून प्रस्थापित होणार आहे, असे उपाध्ये यांनी पत्रकात नमूद केले आहे.



### खारघर भाजपतर्फे अनाथाश्रमात फळवाटप

**खारघर : रामप्रहर वृत्त**

सेवा व समर्पण अभियानांतर्गत विविध कार्यक्रम राबवण्याच्या येत आहेत. त्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिका प्रभाग ५ मधील नगरसेवक रामजी बेरा यांच्या माध्यमातून बुधवारी (दि. ६) खारघर सेक्टर १२ मधील गिरिजाघर आश्रमातील ३५ मुले व आशालय बालगृहातील ४५ मुला–मुलींना फळवाटप करण्यात आले.

या वेळी खारघर मंडलचे सरचिटणीस तसेच सेवा व समर्पण अभियान प्रमुख दीपक शिंदे, व्यापारी सेलचे संयोजक अंबालाल पटेल, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मुंबई व नवी मुंबई वैद्यकीय विद्यार्थी आघाडीचे संयोजक विजय उजळंबे, आदर्श सहानी तसेच गिरिजाघरचे व्यवस्थापक वसंत कुंजर व आशालयाच्या प्रिया मगर उपस्थित होत्या.

## सिडकोकडून विशेष गृहनिर्माण योजनेच्या अर्जदारांसाठी मुदतवाढ

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाच्या कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचारी गृहनिर्माण योजनेकरिता अर्जदारांना कर्जाची प्रक्रिया पूर्ण करण्यास पुरेसा अवधी मिळावा याकरिता या योजनेस २१ ऑक्टोबर २०२१पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. मुदतवाढ दिल्यामुळे अर्जदारांना अर्ज करण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे गोळा करण्यास पुरेसा अवधी मिळणार आहे.

अर्जदारांना अनामत रकमेचा भरणा करणे सुलभ व्हावे याकरिता सिडकोने आपल्या एम्पॅनल्ड बँकांमार्फत कर्जाची सुविध उपलब्ध करून दिली आहे. अधिवास प्रमाणपत्र, कोविड योद्धा प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे गोळा करण्यास जाणारा वेळ विचारात घेऊन मुदतवाढ देण्यात आल्याने कोविड योद्ध्यांना अर्जाची प्रक्रिया पूर्ण करण्यास पुरेसा कालावधी मिळणार आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता दोन लाख रुपये आणि सर्वसाधारण प्रवर्गाकरिता २.५ लाख रुपये अनामत रक्कम लागू आहे. यापूर्वी या योजनेकरिता ९ सप्टेंबर २०२१ ही अंतिम मुदत होती, परंतु अर्जदारांनी केलेल्या विनंतीवरून योजनेस ७ ऑक्टोबर २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. अनेक अर्जदारांनी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अनामत रक्कम भरण्याकरिता काहीतरी व्यवस्था करण्यात यावी, अशी विनंती सिडकोला केली होती. यानुसार सिडकोने आपल्या एम्पॅनल्ड बँकांशी संपर्क साधून अर्जदारांना अनामत रक्कम भरण्याकरिता कर्ज पुरवठा करण्याबाबत सुचवले. यानंतर मे. कॅनरा बँक, मे. क्सिस बँक, मे. टीजेएसबी बँक, साउथ इंडियन बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि पीएनबी बँक या बँकांनी अर्जदारांना अनामत रकमेसाठी कर्ज देण्यास संमती दर्शविली. बँकांची यादी व संपर्क क्रमांक https://lottery.cidcoindia.com या संकेतस्थळावरही प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

अर्जदार व बँका यांमध्ये या संदर्भात करण्यात येणाऱ्या व्यवहारात सिडकोची कोणतीही भूमिका नसून अर्जदारांनी आपल्या जबाबादारीवर या बँकांशी व्यवहार करावा, असे सिडकोकडून कळविण्यात आले आहे.



**पनवेल : भाजप युवा मोर्चाचे शहर सरचिटणीस गौरव कांडपिळे यांना वाढदिवसानिमित्त बुधवारी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी नगरसेविका दर्शना भोईर, युवा मोर्चा शहर अध्यक्ष रोहित जगताप, नूतन पाटील, आकाश भाटी आदी उपस्थित होते.**

## सिडकोतर्फे गुंतवणुकीच्या विविध संधींसंदर्भात कार्यक्रम

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळातर्फे ०८ ऑक्टोबर २०२१ रोजी सिडको इन्व्हेस्टमेन्ट ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर समीट (आभासी–व्हर्च्युअल) चे आयोजन करण्यात आले असून नवी मुंबईमध्ये उपलब्ध असलेल्या गुंतवणुकीच्या विविध संधींविषयी या कार्यक्रमात चर्चा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात स्वतंत्र आणि समर्पित सत्रांमध्ये नवी मुंबईमध्ये यापूर्वीच ज्यांनी गुंतवणूक केली आहे, असे गुंतवणूकदार नवी मुंबईत गुंतवणूक करण्याचे फायदे आणि नवी मुंबईमध्ये गुंतवणूक करण्याकरिता सर्वसाधारण माहिती याविषयी सर्वसाधारण जनतेशी संवाद साधणार आहेत.

या कार्यक्रमात नियोजित काळात विविध प्रकल्प पूर्ण करण्याच्या सिडकोच्या क्षमता आणि नवी मुंबईमध्ये सिडकोकडून करण्यात आलेली बांधकामे आणि विकास याबद्दलही माहिती देण्यात येणार आहे. तसेच नवी मुंबईतील आतिथ्य, आरोग्य, शिक्षण, क्रीडा व इतर क्षेत्रांचा विकास सुकर व्हावा, याकरिता सिडकोने हाती घेतलेल्या विविध विकास प्रकल्पांबद्दलही या कार्यक्रमात माहिती सांगण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम सिडको आणि भावी गुंतवणूकदार, विकासक, बांधकाम कंपन्या व संघटना यांदरम्यान संवाद प्रस्थापित करण्याकरिता उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. यामुळे सिडकोला नवी मुंबईमध्ये गुंतवणुकीच्या व्यवहार्य आणि आकर्षक संधी निर्माण करण्याकरिता उपाययोजना आणि धोरण आखण्यास मदत होणार आहे.

या कार्यक्रमास सिडकोतील अधिकाऱ्यांसह NAREDCO, CREDAI, MCHIसारख्या नामांकित संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असून आपले विचार ते या कार्यक्रमाच्या माध्यमातून मांडणार आहेत. तसेच शिक्षण, आरोग्य, परिवहन आणि क्रीडा क्षेत्रांतील प्रतिनिधीही उपस्थित राहून आपले विचार मांडणार आहेत.

कार्यक्रम (समीट) हा सर्व गुंतवणूकदार आणि सर्वसामान्य नागरिकांकरिता खुला असून या कार्यक्रमास उपस्थित राहण्याकरिता https://avtaar.eletsonline.com/cidco/registration या संकेतस्थळावर नोंदणी करण्यात यावी. कार्यक्रमाच्या अधिक माहितीसाठी http://cidco.eletsonline.com या संकेतस्थळाला भेट द्यावी.



## अॅड. मनोज भुजबळ यांच्या नगरसेवक निधीतून रस्त्यांची कामे

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नवनाथ नगर झोपडपट्टीतील अंतर्गत गटार बांधून रस्त्यांचे काँक्रिटीकरण अॅड. मनोज भुजबळ यांच्या नगरसेवक निधीतून करण्यात आले. त्याबद्दल तेथील नागरिकांनी अॅड. भुजबळ यांचे आभार मानले आहेत.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १७ मधील रेल्वे स्टेशन रोडवरील पाण्याच्या हौदा मागे असलेल्या नवनाथ नगर झोपडपट्टीतील अंतर्गत गटार बांधून रस्त्यांचे काँक्रिटीकरण नुकतेच अॅड. मनोज भुजबळ यांच्या नगरसेवक निधीतून करण्यात आले.

या वेळी प्रभाग १७ मधील नगरसेवक अॅड. मनोज भुजबळ, प्रकाश बिनेदार, नगरसेविका वृषाली वाघमारे, राहुल वाहूळकर आणि रावसाहेब खरात उपस्थित होते.

## पथविक्रेत्यांना सर्वेक्षण करून घेण्याचे आवाहन

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या वतीने दीनदयाळ अंत्योदय योजना–राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियानांतर्गत नागरी पथविक्रेत्यांना (फेरीवाले) सहाय्य दिले जाते. या अभियानांतर्गत महापालिका क्षेत्रातील नागरी भागात मागील वर्षी पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण चालू केले होते. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ज्या फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्याचे बाकी राहीले आहे, त्यांनी त्वरीत आपले सर्वेक्षण करून घ्यावे, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

पनवेल महापालिकेमार्फत 'फेरीवाले धोरण २००९'ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर १९ एप्रिल २०२० पासून सर्वेक्षणाचे काम बंद करण्यात आले होते. हे सर्वेक्षण ६ ऑक्टोबरपासून सुरू करण्यात आले असून आत्तापर्यंत ७१६१ फेरीवाल्यांचे सर्वेक्षण झाले आहे.

सर्व मूळ कागदपत्रे सर्वेक्षणामध्ये प्रथम नोंदणी झाल्यानंतर सात दिवसांच्या आत पनवेल मधील कै. विलासराव देशमुख व्यापारी संकुलातील पहिला मजला गाळा क्रमांक ११४ येथे जमा करावीत. याचबरोबर त्याची एक साक्षांकित केलेली प्रत सादर करावी. कागदपत्रांची तपासणी व स्कॅनिंग केल्यानंतर मूळ कागदपत्रे सबंधित फेरीवाल्यास परत केली जातील. तसेच आपला आधार नंबर मोबाईल नंबरला जोडला नसल्यास अधिकृत आधार केंद्रातून तत्काळ जोडणी करून घ्यावा तसेच ज्यांचे सर्वेक्षण झालेले आहे त्यांनी कागदपत्रे दिलेल्या पत्यावर तात्काळ जमा करावे.

**आवश्यक कागदपत्रे**

आधारकार्ड, तहसीलदार यांनी दिलेले अधिवास प्रमाणपत्र (डोमेसाईल), रेशनकार्ड, जातीचे प्रमाणपत्र, दिव्यांग प्रमाणपत्र, विधवा असल्यास पतीचे मृत्यू प्रमाणपत्र, परितक्ता किंवा घटस्फोटीत असल्यास प्रमाणीकरण कागदपत्रे, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो.

**पात्रता निकष**

फेरीवाला भारतीय नागरिक असावा. फेरीवाला महाराष्ट्रातील अधिवासी असावा. सर्वेक्षणाच्या दिनांकास फेरीवाल्याचे वय १६ वर्षापेक्षा कमी असणार नाही. पथविक्री खेरीज उपजीविकेचे इतर कोणतेही साधन असणार नाही.





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
गुरुवार, दि. ७ ऑक्टोबर २०२१ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस
(वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. यूपीएचसी–२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
- ३. यूपीएचसी–३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी–४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर ■ १२. रोटरी क्लब, नवीन पनवेल
- १३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे–मुंबई हायवे)
- १४. श्री गणेश विद्यामंदिर प्राथमिक शाळा नंबर ६, धाकटा खांदा
- १५. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल ■ १६. न्यू इंग्लिश स्कुल, कळंबोली
- १७. सेंट्रल रेल्वे, पनवेल

कोवॅक्सिन

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल

पनवेल ग्रामीण लसीकरण

- धानसर रा.जि.प. शाळा ■ तोंडरे खालचा पाडा, रा.जि.प. शाळा
- पेठ, रा.जि.प. शाळा ■ रोडपाली बौद्धवाडी ■ ढोंगऱ्याचा पाडा रा.जि.प. शाळा

**निर्देशित केलेल्या लसीकरण केंद्रांवर पहिल्या डोसकरिता २०० व दुसऱ्या डोसकरिता १०० डोस उपलब्ध असतील याची नागरिकांनी नोंद घ्यावी.**

## निवडक



### विवेक खाडे यांची बिनविरोध निवड

**पनवेल :** शहरातील गुरुकृपा मोटार ट्रेनिंग स्कूलचे विवेक खाडे यांची मोटार ड्रायव्हींग स्कूल ओनर्स असोसिशनच्या महाराष्ट्र राज्याच्या प्रवक्तेपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. विवेक खाडे यांचे पनवेल शहरात अत्यंत जुने असे गुरुकृपा मोटार ट्रेनिंग स्कूल हे आहे. त्यांनी आतापर्यंत केलेल्या कार्याची व संघटनेला केलेल्या सहकार्याची दखल घेवून नुकत्याच झालेल्या बैठकीमध्ये त्यांना सर्वानुमते राज्याच्या प्रवक्तेपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे व तसे पत्र देण्यात आले आहे.

### पत्रकार राकेश खराडे सन्मानित



**मोहोपाडा :** हिंदुस्थान बुक ऑफ रेकॉर्डमध्ये पत्रकार राकेश काशिनाथ खराडे यांच्या पत्रकारीतेची नोंद करण्यात आली आहे. खराडे यांना हिंदूस्थान बुक ऑफ अवार्ड सन २०२१च्या आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रभुषण पुरस्काराने मंगळवारी (दि. ५) केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. पत्रकार राकेश खराडे यांनी विविध दैनिक वर्तमानपत्रांत काम करीत असताना आपल्या लेखनातून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी लेखणी ते करत आहेत. सन्मानाच्या वेळी अभिनेत्री मयुरी शुभानंद, सिने डायरेक्टर प्रसाद ताटकर आदी उपस्थित होते.

### शितोळे कुटुंबीयांना मदतीचा हात



**पनवेल :** तालुक्यातील विचुंबे येथील रिक्षाचालक दत्तात्रेय शितोळे यांचे नुकतेच निधन झाले. घरातील कर्ता पुरुष गेल्याने अनेक संकटे शितोळे कुटुंबीयांसमोर उभी राहिली. यामुळे पत्रकार मित्र असोसिएशन व राजे प्रतिष्ठान कामगार सेनेने शितोळे कुटुंबीयांना जीवनाश्यक वस्तू व आर्थिक स्वरूपाची मदत केली. या वेळी कोकण संध्याचे संपादक व ज्येष्ठ पत्रकार दीपक महाडिक, राजे प्रतिष्ठानचे महाराष्ट्र उपाध्यक्ष बशीर कुरेशी, पत्रकार मित्र असोसिएशनचे अध्यक्ष केवल महाडिक, समाजसेविका नूरजहाँ कुरेशी, पत्रकार संतोष आमले, राजे प्रतिष्ठानचे तालुका सचिव राकेश मोरे, दादासाहेब घालमे, कविता बनसोडे, वनिता मांजरेकर, प्रदीप धोत्रे, सीताराम पवार, सतीश रणखांबे आदी उपस्थित होते.

### डॉ. एलिस जयकर यांची नियुक्ती

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील डॉ. एलिस जयकर यांची



भारतातील सर्वात मोठी ख्रिश्चन संस्था ख्रिश्चन एकता मंचचे राष्ट्रीय प्रवक्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. एलिस यांची नियुक्ती ख्रिश्चन एकता मंचचे राष्ट्रीय अध्यक्ष, डॉ. प्रभूदास दुप्ते, महिला अध्यक्ष सुशीला पल्लीचा, राष्ट्रीय सहसचिव विश्वास भोसले आणि दिल्ली प्रदेश अध्यक्ष डॉ. जोशुआ गमांगो यांच्या द्वारे करण्यात आली. डॉ. एलिस जयकर भारतातील विविध संप्रदाय घटकात काम करत आहेत राष्ट्रीय प्रवक्ते म्हणून ते अधिक प्रभाव पाडू शकतील, असा विश्वास जसपाल सिंह नेओल यांनी व्यक्त केला आहे.

# उरणमध्ये जलवाहिनी फुटून पाणी वाया

## वारंवार होणाऱ्या प्रकाराने एमआयडीसीच्या सुविधेवर प्रश्नचिन्ह



**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

उरण परिसराला पाणीपुरवठा करणारी एमआयडीसीची तीन इंच व्यासाची जलवाहिनी मंगळवारी (दि. ५) सकाळी पुन्हा एकदा अचानक फुटण्याची घटना घडली. जेएनपीटी टाऊनशीप-नवघरदरम्यान फुटलेल्या उच्च दाबाच्या जलवाहिनीमुळे सुमारे २५ फुट उंचीपर्यंत पाण्याचे कारंजे उडून लाखो लिटर्स पाणी वाया गेले, परंतु नवघर ते बोकडविरा या एक किमी अंतरावर एमआयडीसीची जलवाहिनी वारंवार फुटतय कशी हा चर्चेचा विषय ठरला आहे.



उरण तालुक्यातील औद्योगिक, शहर व ग्रामीण परिसरातील दिड लाख नागरिकांना एमआयडीसीच्या माध्यमातून रानसई धरणातून पाणीपुरवठा केला जातो. मंगळवारी जेएनपीटी टाऊनशीप-नवघरदरम्यान एमआयडीसीची तीन फूट व्यासाची पाण्याची मुख्य जलवाहिनी अचानक फुटली. या फुटलेल्या जलवाहिन्यांमधुन २५ फुटांपर्यंत पाणी उडाले होते. तासभर पाणी मोठ्या प्रमाणावर उडाल्याने जेएनपीटी टाऊनशीप-नवघरदरम्यानच्या रस्त्यावर पाणीच पाणी झाले होते.

एमआयडीसीच्या कर्मचाऱ्यांनी तत्काळ व्हॉल्व बंद करून प्रथम वाया जाणारे पाणी थांबवले. दिड तासातच जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम करुन पाणीपुरवठा सुरळीत सुरू केला. उच्च दाबामुळे वेल्डिंग जॉइंडला तडा गेल्याने जलवाहिनी फुटली असल्याची माहिती एमआयडीसीचे उपअभियंता रणजित काळबागे यांनी दिली आहे.

उरण शहर तसेच परिसरातील रहिवाशांना, प्रकल्पांना सुरळीत करण्यात येत असलेल्या पाणी पुरवठ्याच्या एमआयडीसीच्या नवा जलवाहिनीचे काम मागील वर्षी ठेकेदारांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपये खर्च करून करण्यात आले, मात्र असे असतानाही वारंवार नवघर ते बोकडविरा या दरम्यानची जलवाहिनी फुटत असेल तर या मागे गोड बंगाल काय, अशी चर्चा सध्या उरणमध्ये रंगू लागली आहे.

## उरण येथे रस्ता काँक्रिटीकरणाचे भूमिपूजन

**उरण : वार्ताहर**

उरण नगर परिषद हद्दीतील श्री सिद्धिविनायक सोसायटी रस्त्याची दुरवस्था झाली होती. येथील नागरिकांनी या रस्त्यामुळे होणारा त्रास नगराध्यक्ष सायली म्हात्रे यांना सांगितला. त्यानुसार आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री सिद्धिविनायक सोसायटीमधील रस्त्याचे काँक्रिटीकरण कामास सुरुवात करण्यात आले. या कामाचे भूमिपूजन मंगळवारी (दि. ५) नगराध्यक्ष सायली म्हात्रे यांच्या हस्ते व नागरिकांच्या उपस्थित करण्यात आले.

या वेळी वसंत म्हात्रे, संजय चिपळूणकर, विकास कडू, स्नेहा चिपळूणकर, कांचन कडू, अशोक पाटील, रोहित पाटील, चंद्रकांत वैवडे, राजेंद्र हाबडे, अमिरूळ शेख, रोहिणी वैवडे, परशुराम एरंडे, वासंती म्हात्रे, सरीता कजबजे, सुर्यकांत दर्णे, प्रवीण पाटील, प्रगती एरंडे, प्रमोद म्हात्रे, हेमंत म्हात्रे, लालमनी यादव, निखील गुरव, प्रियंका म्हात्रे आदी उपस्थित होते.

उरणमध्ये आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली व नगराध्यक्ष सायली म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली विविध विकासकामे होत आहेत.



## श्री गोवर्धनी माता मंदिरात नवरात्रोत्सव होणार साजरा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भक्तांच्या नवसाला पावणाऱ्या किल्ले बेलापूर येथील पेशवेकालीन श्री गोवर्धनी माता मंदिरात सालाबादप्रमाणे यंदाही मोठ्या धार्मिक वातावरणात नवरात्रोत्सव होणार असल्याचे बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी म्हटले आहे.

नवी मुंबईतील सुमारे दोनशे वर्षांपूर्वीचे पुरातन पेशवेकालीन एकमेव मंदिर म्हणजे श्री गोवर्धनी मातेचे मंदिर अशी अख्यायिका आहे. श्री गोवर्धनी मातेची प्राणप्रतिष्ठापना पेशवेकाळात झाली असून नवी मुंबईतील नव्हे तर संपूर्ण पंचक्रोशातील ठाणे, रायगड, पालघर जिल्ह्यातील सर्व भाविक भक्तांना नवसाला पावणारी आई म्हणून श्री गोवर्धनी माता प्रसिद्ध आहे. या पुरातन पेशवेकालीन मंदिराचा जीर्णोद्धार आमदार मंदा म्हात्रे यांनी गेल्या १३ वर्षांपूर्वी केला असून सुंदर भव्य असे मंदिर दक्षिणात्य पद्धतीने उभारले आहे.

किल्ले गावठाण, बेलापूर येथील या श्री गोवर्धनी मातेच्या मंदिरात नवरात्री उत्सव शासनाचे सर्व नियम पाळून साजरा केला जाणार आहे. सालाबादप्रमाणे



यावर्षीही पहिल्या दिवशी अभिषेक, देवीची घटस्थापना व आरती, दररोज सकाळी व सायंकाळी देवीची आरती होणार आहे. नवरात्र उत्सवाच्या शेवटच्या दसऱ्याच्या दिवशी १५ सप्टेंबर रोजी श्री गोवर्धनी माता मंदिरात नवचंडी होम करण्यात येणार आहे. कोविडची सद्यपरिस्थिती लक्षात घेता दर्शनासाठी येणाऱ्या सर्व भाविकांनी मास्क वापरावे, सामाजिक अंतर राखावे तसेच शासनाच्या सर्व नियमांचे पालन करण्याचे आवाहन बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी केले आहे.

## मुर्बी गावात कोरोना लसीकरण केंद्र



**खारघर : आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल व सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या सहयोगाने नगरसेवक अभिमन्यू पाटील यांच्या प्रयत्नातून आणि महापालिकेमार्फत मुर्बी गावातील ग्रामस्थांसाठी कोरोना प्रतिबंधक लसीकरण केंद्र सुरू करण्यात आले आहे. बुधवारी एकूण १८३ ग्रामस्थांचे लसीकरण करण्यात आले. या लसीकरण केंद्रावर नगरसेवक अभिमन्यू पाटील आणि भाजप युवा नेता नितेश पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यांसह दिवसभर उपस्थित राहून तेथील कर्मचारी व ग्रामस्थांची मदत केली.**

## फुंडे हायस्कूलमध्ये 'रयत'चा वर्धापन दिन उत्साहात



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण फुंडे येथील तु. ह. वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात सोमवारी (दि. ४) रयत शिक्षण संस्थेचा १०२वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. दुग्धशर्करा योग असा की याच शुभदिनी चालू शैक्षणिक वर्षातील शाळेची घंटा वाजली.

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली आणि संपूर्ण आशिया खंडात सर्वांत मोठी संस्था अशी ख्याति प्राप्त झालेली रयत शिक्षण संस्थेचा १०२वा वर्धापन दिन महाराष्ट्रातील सर्व शाखांमध्ये साजरा करण्यात आला. विद्यालयाचे प्राचार्य एम. एच. पाटील, पर्यवेक्षक जी. सी. गोडगे, एस. जी. म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज प्रमुख व्ही. के. कुटे आणि सर्व रयत सेवकवृंद यांच्या उपस्थित कर्मवीर अण्णा आणि रयत माऊली लक्ष्मीबाई यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यानंतर चालू शैक्षणिक वर्षातील हा शाळेचा पहिला दिवस असल्याने खऱ्या अर्थाने सर्व रयत सेवकांना आणि विद्यार्थ्यांना याचा आनंद झाला. विद्यालयाचे प्राचार्य, पर्यवेक्षक आणि सर्व शिक्षक वृंदानी शाळेच्या पहिल्या दिवशी हजर असलेल्या सर्व नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प आणि चॉकलेट देवून त्यांचे स्वागत केले. प्राचार्य एम. एच पाटील यांनी विद्यार्थ्यांना कोरोना आजाराविषयी माहिती सांगत शाळेत आपण सर्वांनी कोणती काळजी घेतली पाहिजे याचे मार्गदर्शन करत सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

यानंतर इयत्ता पाचवी ते आठवी नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. ग्रंथपाल डी. ए. घरत यांनी प्रत्येक वर्गात जाऊन पाठपुस्तकांचे वाटप केले.

## नवरात्रोत्सवानिमित्त बाजारपेठा सजल्या

**उरण : वार्ताहर**

नवशक्तीच्या उत्सवाचे स्वागत करण्यासाठी बुधवारी (दि. ६) उरण शहरातील बाजारपेठा सजलेल्या दिसत होत्या. नवरात्र काळात लागणारे विविध साहित्य बाजारपेठेत विक्रीसाठी आले असून पूजेच्या खरेदी करण्यासाठी अनेक महिला बाजारात खरेदीसाठी आल्या होत्या. कोरोनामुळे वाढलेल्या महागाईचा मातीच्या घटाबरोबरच देवीच्या फटका नवरात्र उत्सवाला सुद्धा बसला आहे.



हा उत्सव गुरुवारपासून सुरू होत असल्याने बाजारपेठेत उत्सवासाठी लागणारे विविध साहित्य खरेदी करण्यासाठी गर्दी होत आहे. यामध्ये घटस्थापनेसाठी आवश्यक असणारी मडकी, घट, मुकुट, फैटे, दागदागिने, मंदिर, तोरण, झालर, परडी, नाडा, आकर्षक झुंबर असे विविध साहित्य खरेदी करण्यास महिलांचे प्राधान्य आहे.

घटस्थापना करण्यासाठी लागणाऱ्या वस्तू विक्री करण्यासाठी उरण बाजारात विक्रेत्यांनी गर्दी केली आहे. देवीच्या घटासाठी विधिवत पूजेसाठी लागणारे खण-साडी, बांगडीओटी तसेच घटाच्या पूजेसाठी पत्रावळीही बाजारात विक्रीसाठी दाखल झाली आहे. यामध्ये लहान मोठी अशा दोन प्रकारची पत्रावळी आहे. तसेच पाच फळे यामध्ये कोट, कवडा, सीताफळ, बेलफूल, पेरू याचा समावेश आहे.

देवीसाठी लागणाऱ्या साहित्यांच्या किमती देवीसाठी लागणारा घट (गरबा) नक्षीकाम केलेले ३०० रुपयांस एक अश्या भावाने विकतो, असे लीलाबाई वाघरी यांनी सांगितले. तर लाल घट बाजारात ७० रुपयाला मिळत आहे, तर काळा घट ४० रुपयापर्यंत किमत आहे. त्यासाठी लागणारी परडी ५० रुपयाला मिळत आहे. पूजेसाठी लागणारे लाल कापड ६० रुपयाला आहे.

हळद, कुंकू, कापूर, अगरबत्ती गुलाल, धूपकांडी ही बाजारात उपलब्ध आहे. मंदिरामध्ये देवीपुढे दिवा लावण्यासाठी वाती १५ रुपयाला आहेत. नारळ २० ते ३५ रुपयाला आहे. मोठी परडी १५० ते २०० रुपयाला आहे. तर मंडपी ४० रुपयाला आहे. देवीचे गार पाकीट ४० ते ८० रुपये, तसेव देवीच्या पूजेसाठी लागणारी लोभागदाणी, ऊददाणीही बाजारात आल्या आहेत. एक घट बसविण्यासाठी घटारवठी लागणारी काळी माती २० रुपयाला मिळत आहे, अशी माहिती विक्रेत्यांनी दिली.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी
राम प्रहर

## 'वन्यजीव'ने दिले पावणे दोन लाख सापांना जीवदान

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

नुसते साप असे जरी कोणी म्हटले तरी अनेकांची भंबेरी उडते. प्रत्यक्षात साप दिसला तर काय अवस्था होते, हे सांगायला नकोच, परंतु लोकांच्या मनातील सापांविषेयी असणारी भीती दूर करण्यासाठी वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेचे पदाधिकारी, सर्पमित्र गेल्या २०१२पासून धडपडत आहेत. या संस्थेने आजपर्यंत जवळजवळ विविध जातींच्या एक लाख ९५ हजार सापांना जीवदान देण्याचे काम केले आहे.

मुंबई व नवी मुंबई शहराच्या हाकेच्या अंतरावर असणारा उरण हा तालुका समुद्राच्या कुशीत तसेच डोंगर रांगेत वसलेला तालुका आहे. त्यामुळे या तालुक्यात विविध जातींच्या सापांचा अधिवास मोठ्या प्रमाणात आहे. दगड आणि मातीच्या उत्खननामूळे विविध जातींचे साप मोठ्या प्रमाणात स्वतःचे संरक्षण,अन्न शोधण्यासाठी रहिवाशांच्या वस्तीत शिरताना दिसत आहेत, परंतु



भीतीपोटी व अंधश्रध्देपायी माणसांकडून विनाकारण साप मारले जात असतात.खरे तर हे भूतलावरील जीव पर्यावरणाचा महत्त्वाचा घटक आहेत.त्यांना मारून आपण कळत नकळत पर्यावरणाचा संतुलनावर घाला घालत आहोत. त्यामुळे सापांच्या संख्येत घट होत असल्याने निसर्गचक्र सुरळीत चालण्यासाठी साप वाचविणे गरजेचे आहे. ते काम उरण तालुक्यातील वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्था २०१२ पासून करत आहे. ११ वर्षे वन्य प्राणी पक्षी यांच्या बदल उरण तालुक्याप्रमाणे रसायनी परिसरात ही आपल्या पदाधिकारी व सहकाऱ्यांच्या मदतीने जनजागृती, प्रबोधन करत आहे. चिरनेर या इतिहास प्रसिद्ध गावातील विवेक केणी हे या संस्थेचे अध्यक्ष असून चिर्ले गावातील आनंद मढवी हे तरुण सर्प मित्र संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. आजपर्यंत उरण, जेएनपीटी, आवरे, रसायनी परिसरातून विविध जातींच्या एक लाख ९५ हजार सापांना वन विभागाचे अधिकारी शशांक कदम, इंगोले साहेब, पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली जंगलात सोडून जीवदान दिले आहे.

चिर्ले गावातील सर्पमित्र आनंद मढवी, कळंबुसरे महेश भोईर, सुरेश म्हात्रे, बापु मोकल, काशिनाथ खारपाटील व इतर सहकाऱ्यांच्या मदतीने ओसाड डोंगर भागात वृक्षसंवर्धनाचेही काम वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेच्या माध्यमातून हाती घेतले आहे.

## संपादकीय

# राजकीय शोकांतिका

उत्तर प्रदेशातील लखीमपूर खेरी या गावात शेतकरी आंदोलनादरम्यान घडलेल्या भयंकर हिंसक प्रकारामुळे देशभरातील राजकारण ढवळून निघाले आहे. या दुर्दैवी घटनेच्या निमित्ताने केंद्रात आणि उत्तर प्रदेशात सत्तेवर असलेल्या भारतीय जनता पक्षाला लक्ष्य करत विरोधकांनी आक्रमक पवित्रा घेतलेला दिसतो.

उत्तर प्रदेशातील लखीमपूर खेरी गावात आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांच्या अंगावर आशिष मिश्रा या मंत्रिपुत्राने गाडी घालून चार जणांना चिरडले व त्यानंतर झालेल्या गोळीबारात आणि हिंसाचारात आणखी चार जणांचा बळी गेला असा आरोप केला जातो आहे. केंद्रीय गृह राज्यमंत्री अजय मिश्रा यांचे आशिष मिश्रा हे पुत्र आहेत. तेथील दुर्दैवी घटनेत एकंदर आठ जणांचे प्राण हकनाक गेले असून उत्तर प्रदेश सरकारने मृतांच्या नातलगांना प्रत्येकी ४५ लाख रुपयांचे अर्थसाह्य जाहीर केले आहे. उत्तर प्रदेशातील योगी सरकारने झालेल्या प्रकाराची ताबडतोब दखल घेत संबंधित आरोपींच्या विरोधात एफआयआर दाखल केला व या संपूर्ण प्रकाराची न्यायिक चौकशी होईल असेही जाहीर करण्यात आले. गुन्हेगार कुठल्याही पक्षाचा किंवा कितीही मोठा असो, त्याला कठोरातील कठोर शासन होईल असे आश्वासन तेथील भाजप सरकारने दिले असल्यामुळे हे प्रकरण येथेच थांबणे अपेक्षित होते, परंतु दुर्दैवाने तसे घडले नाही. किसान आंदोलने हा आता नाजूक विषय झाला आहे. आपला भारत देश कृषीप्रधान असल्यामुळे शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत सारेच हळवे असतात. किसान आंदोलनाबाबत देखील केंद्र सरकारने आजवर सहानुभूतीपूर्वक संवेदनशील दृष्टिकोनच स्वीकारलेला आहे. उलटपक्षी, काँग्रेससारखे विरोधी पक्ष असल्या दुर्दैवी प्रकारांच्या निमित्ताने आपली राजकीय पोळी भाजून घेताना दिसतात. लखीमपूर खेरी येथील दुर्दैवी घटनेनंतर काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी तेथे धाव घेतली, परंतु त्यांना सोमवारी लखनौ येथे स्थानबद्ध करण्यात आले. पाठोपाठ त्यांचे बंधू व काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी बुधवारी पत्रकार परिषद घेऊन आपण देखील लखीमपूर येथे जात असल्याचे जाहीर केले व त्यानुसार छत्तीसगढचे मुख्यमंत्री भूपेश बघेल आणि पंजाबचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री चरणजितसिंग चन्नी यांच्यासमवेत लखीमपूरकडे कूच केले. प्रियांका गांधी व राहुल गांधी या भावाबहिणीचे हे दौरे निव्वळ राजकीय हेतूपोटीच आहेत हे लपून राहिलेले नाही. लखीमपूर प्रकरणी आगीमध्ये जमेल तितके तेल ओतण्याचे काम ही नेतेमंडळी अनिर्बंधपणे करत आहेत. केंद्र सरकार आणि उत्तर प्रदेश सरकारचा प्रयत्न लखीमपूर परिसरात शांतता प्रस्थापित करण्याचा आहे. तशी ती प्रस्थापित करण्यामध्ये योगी सरकारने काही तासांतच यश मिळवले हे विशेष, परंतु नेमकी हीच बाब विरोधकांना खटकते आहे. शेतकऱ्यांच्या आंदोलनाबाबत सर्वांनाच सहानुभूती आहे. दिल्लीच्या सरहद्दीवर किसानांचे आंदोलन सुरू आहे, त्याला आता वर्ष होईल, परंतु या आंदोलनाला सरळ सरळ राजकीय रंग चढू लागला आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यात देखील लखीमपूर घटनेचे पडसाद उमटले. या घटनेच्या निषेधार्थ सत्ताधारी महाविकास आघाडीने बंदची घोषणा केली आहे. हा एक मोठा विनोदच म्हणायला हवा. महाराष्ट्रातील शेतकरी मदतीविना अक्षरश: टाहो फोडत असताना महाविकास आघाडीला मात्र उत्तरेतील किसानांना पाठिंबा देण्यासाठी बंद पुकारावासा वाटतो हे अनाकलनीय आहे. विरोधकांचे नक्राश्रू महाराष्ट्राचीच नव्हे, तर उत्तर प्रदेशातील जनता देखील ओळखून आहे हे त्यांनी ध्यानी ठेवावे.

# मिशन वात्सल्य



कोविड महामारीच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेमध्ये अनेक नागरिकांचे निधन झाले आहे. अनेक ठिकाणी एकाच कुटुंबातील आई आणि वडील अशा दोन्ही पालकांचे निधन झाल्याने ० ते १८ वयोगटातील बालके अनाथ झाली आहेत. तर घरातील कर्त्यापुरुषाचे निधन होवून अनेक महिला एकल/विधवा झाल्या आहेत. कोविडमुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना न्याय हक्क मिळवून देवून त्यांचे यथायोग्य संगोपन करणे तसेच घरातील कर्त्यापुरुषाचे निधन होवून विधवा झालेल्या महिलांचे योग्य पुनर्वसन करण्याची आवश्यकता आहे.

कोविड प्रादूर्भावामुळे एकल/विधवा झालेल्या महिलांचे योग्य पुनर्वसन करणे व त्यांचे न्याय्य हक्क अबाधित राखण्याच्या अनुषंगाने जिल्हास्तरावरील कृती दलाची (Task Force) व्याप्ती वाढवून शासनाच्या विविध विभागाच्या योजनांचा या महिलांना लाभ मिळवून देण्याची जबाबदारी कृती दलावर सोपविण्यात आलेली आहे.

एकल/विधवा महिला आणि अनाथ बालके यांच्या कुटूंबियांना प्रत्यक्ष भेट देवून त्यांच्या पुनर्वसनासाठी शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ त्यांना उपलब्ध करून देण्यासाठी शासन आपल्या दारी या संकल्पनेवर आधारीत मिशन वात्सल्य ही योजना राबविण्यात येत आहे.

कोविडमुळे दोन्ही पालकांचे निधन होवून अनाथ झालेल्या बालकांना व कुटूंबातील कर्त्यापुरुषाचे निधन होवून एकल/विधवा झालेल्या महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता करून त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शासन आपल्या दारी या संकल्पनेवर आधारित मिशन वात्सल्य योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मिशन वात्सल्य या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तालुकास्तरीय समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे.

तालुकास्तरीय समिती
अध्यक्ष : तहसीलदार

सदस्य : गटविकास अधिकारी, तालुका शिक्षण अधिकारी, तालुका विधी सेवा प्राधिकरण प्रतिनिधी, नगर परिषदेचे मुख्याधिकारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, पं.स. विस्तार अधिकारी, तालुका कृषी/ पशुसंवर्धन अधिकारी, आदिवासी विकास विभाग प्रकल्प अधिकारी, तालुका संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), स्वयंसेवी संस्थेचा प्रतिनिधी, बाल विकास प्रकल्प अधिकारी.

### समन्वय समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

संपूर्ण तालुक्यात कोविड आजाराने दोन्ही पालकांचे निधन होऊन अनाथ झालेली बालके व कर्त्यापुरुषाचे निधन होऊन एकल / अनाथ झालेल्या महिलांबाबतची माहिती गाव पातळीवर गठित केलेल्या पथकाकडून प्राप्त करुन घेवून अशा महिला, बालकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे.

गाव पातळीवरील पथकाव्दारे प्राप्त प्रस्तावापैकी तालुकास्तरावर मंजूरीचे अधिकार असलेल्या प्रस्तावांना संबंधीत विभाग / कार्यालयाकडून मान्यता मिळवून देणे.

ज्या योजनांच्या मंजूरीबाबतचे अधिकार जिल्हास्तरावर आहेत, असे प्रस्ताव जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांना मंजूरीसाठी पाठविणे व याबाबत सातत्याने पाठपुरावा घेणे.

तालुकास्तरीय समितीने केलेल्या कार्यवाहीचा आढावा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठित कृतीदलाच्या बैठकीमध्ये घेण्यात येईल.

मिशन वात्सल्य या योजनेंतर्गत विधवा महिला आणि अनाथ बालके यांना शासनाच्या विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी तालुकास्तरीय समितीची राहील.

### कुटुंब निवृत्तीवेतन योजना

तहसीलदार कार्यालयाकडून मृत शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या पत्नी व त्याचे पाल्य कुटुंब निवृत्तीवेतनास पात्र असल्यास त्यांना योजनेचा लाभ मिळवून देणे.

एकल/विधवा महिलांना व त्यांच्या पाल्यांना शिधापत्रिका मिळवून देण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे, एकल/विधवा महिला व अनाथ बालक यांना Guardians and Wards Act नुसार, त्यांचे न्याय्य हक्क अबाधित राहण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक प्रमाणपत्र व लाभ मिळवून देणे, नामनिर्देशित व्यक्तीस विमा पॉलिसीचा लाभ मिळवून देणे, ज्या पाल्यांचा जन्माचा दाखला नसेल त्याकरिता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून जन्माचा दाखला बनविणे, कोविडमुळे मृत झालेल्या व्यक्तीचा मृत्यू दाखला व अनाथ बालकांना त्यांचा जन्म दाखला प्राप्त करून देण्यास मदत करणे, विधवा महिला व अनाथ बालकांना जातीचे प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यास मदत करणे, विधवा महिला व अनाथ बालकांना Guardians and Wards Act नुसार त्यांचे मालमत्ता विषयक हक्क प्राप्त करून देणे, संजय गांधी निराधार योजनेचा लाभ उपलब्ध करुन देणे, जे पाल्य दारिद्र्य रेषेखालील असतील त्यांना राष्ट्रीय कुटूंब लाभ योजनेचा लाभ मिळवून देणे, जे पाल्य आजी/आजोबा यांच्याकडे असतील त्या आजी, आजोबांना श्रावण बाळ योजना लागू करून देणे, बालसंगोपन योजनेचा लाभ मिळवून देणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घरकुल योजनेचा लाभ मिळवून देणे, कौशल्य विकास विभागामार्फत आयोजित प्रशिक्षणाचा लाभ मिळवून देणे.

एकल/विधवा महिलांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजनेचा लाभ मिळवून देणे, तसेच शुभमंगल सामूहीक योजना, अंत्योदय योजना, आदिवासी विकास विभाग व कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ मिळवून देणे.

### ग्रामस्तरीय वार्डस्तरीय पथक

या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी तालुकास्तरावर समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमार्फत गावपातळीवरील तलाठी, ग्रामसेवक, प्राथमिक, शिक्षक, अंगणवाडी सेविका तसेच शहरी क्षेत्रातील वार्डनिहाय पथकामध्ये वार्ड अधिकारी, तलाठी, प्राथमिक शिक्षक, अंगणवाडी सेविका यांचा समावेश करण्यात यावा. ही पथके गावातील/शहरातील एकल/विधवा महिला/अनाथ बालकांच्या कुटुंबियांना भेट देवून शासनाच्या विविध योजनांची माहिती देतील. तसेच विविध योजनांचा लाभ उपलब्ध व्हावा यासाठी आवश्यक कागदपत्रे प्राप्त करुन योजनांच्या निकषाप्रमाणे परिपूर्ण प्रस्ताव तयार करून तो प्रस्ताव तालुकास्तरीय समन्वय समितीकडे सादर करतील.

### ग्रामस्तरीय पथकाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

गाव पातळीवरील/शहरी भागातील पथकाने कोरोना कालावधीत अनाथ झालेल्या बालकांच्या तसेच एकल / विधवा महिलांच्या घरी भेट देणे, संबंधीत पात्र लाभार्थ्यांचे कागदपत्राची पूर्तता/अर्ज भरुन घेणे. योजनांचे निकष तपासून परिपूर्ण प्रस्ताव तयार करणे. परिपूर्ण प्रस्ताव तालुका समन्वय समितीस सादर करणे.

करोनामुळे अनाथ झालेल्या बालकांसाठी तसेच एकल अथवा विधवा महिलांच्या योग्य पुनर्वसन होण्यासाठी, त्यांचा आर्थिक व सामाजिक विकास साधून त्यांना भविष्याविषयी आश्वस्त करुन समाजात मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी मिशन वात्सल्य या योजनेच्या माध्यमातून अतिशय सकारात्मक पाऊल उचलले आहे. गरजूंनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर तसेच जिल्हा परिविक्षाधीन अधिकारी अशोक पाटील यांनी केले आहे.

**–मनोज शिवाजी सानप,**
जिल्हा माहिती अधिकारी,
रायगड–अलिबाग



(छाया : अनिस मनियार)



# भाजपचे पेणमध्ये सफाई अभियान

## नगरसेवक राजेश म्हात्रे यांचा पुढाकार

**पेण : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष व पेण शहर मल्याळी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून पेण सिव्हिल हॉस्पिटलमध्ये सफाई अभियान राबविण्यात आले.

नगरसेवक राजेश म्हात्रे यांच्या पुढाकाराने पेण सिव्हिल हॉस्पिटलमध्ये राबविण्यात आलेल्या या सफाई अभियानात मल्याळी समाजाचे पेण अध्यक्ष श्यामभाई, मोहन नायर, सजीस नायर, श्रीकांत नायर, सौरभ नायर, वर्गिस भाई यांच्यासह भाजप व मल्याळी समाजाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कोरोना काळात जीवाची पर्वा न करता जनतेची सेवा करणाऱ्या कामगारांचा नगर परिषदेचे सभापती राजेश म्हात्रे, भाजपचे पेण शहर सरचिटणीस राकेश म्हात्रे, चिटणीस अजित पाटील व जमीर खान यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# ओबीसींनी संघटीत होण्याची गरज –सुरेश मगर

**रोहे : प्रतिनिधी**

शासन दरबारी हक्क मिळविण्यासाठी ओबीसी समाजाने एकत्रित येण्याची गरज आहे, असे प्रतिपादन रोहा तालुका ओबीसी संघर्ष समन्वय समितीचे अध्यक्ष सुरेश मगर यांनी येथे केले. रोहा तालुका ओबीसी संघर्ष समन्वय समितीची बैठक शासकीय विश्रामगृहात झाली. प्रास्ताविक सरचिटणीस महादेव सरसंबे यांनी केले. संघटनेत कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम केले पाहिजे, असे मत जिल्हा कार्यकारणी सदस्य शिवराम शिंदे यांनी यांनी व्यक्त केले. जिल्हा कार्यकारणी सदस्य शिवराम महाबळे, तालुका उपाध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, शंकरराव भगत, नंदकुमार म्हात्रे, महेश बामुगडे, अमित मोहिते, महेंद्र मोरे यांनीही मनोगत व्यक्त केले. या बैठकीत रोहा शहर, धाटाव, खांब, भातसई, चणेरा विभागातील पदाधिकाऱ्यांचा सामूहिक सन्मान करण्यात आला.

संघटनेचे सल्लागार काशिनाथ धाटावकर तसेच अमोल पेणकर, अनंत थिटे, माधव आग्री, सुहास खरीवले, प्रफुल्ल पडवळ, रवींद्र चाळके, शाम लोखंडे, राम कापसे, लक्ष्मण मोरे, हरिश्चंद्र मोरे, शशिकांत कडू, रामाशेठ म्हात्रे, नवनीत डोलकर, गुणाजी पोटफोडे, जगनाथ कुंडे, हरेश नायनेकर, प्रकाश कोळी, हर्षद साळवी, प्रेषित बारटक्के, गणेश खरीवले, अमित पवार, राम माकती, संजय बिर्जे, राकोश गुरव, चंदकांत भगत, अरविंद मगर आदी पदाधिकारी व कायकर्ते उपस्थित होते. अमोल पेणकर यांनी आभार मानले.

(छाया : जितू शिगवण)



# तरुणीला जबर मारहाण करून ठार मारण्याचा प्रयत्न

- सात दिवसांनंतरही अनेक आरोपी मोकाट
- जिल्हा प्रशासनाकडे कारवाईची मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

धोकवडे–गायचोळे येथे जमीन विकसित करण्याचे काम करणाऱ्या तरुणीसह तिच्या सहकाऱ्याला २० जणांच्या जमावाने लोखंडी रॉडने जबर मारहाण केली. या वेळी आरोपींच्या सोबत असणाऱ्या सात महिलांनी मिळून मारहाण करीत एकीने नॉयलॉनच्या दोरीने गळा आवळून ठार मारण्याचा प्रयत्न केला. याबाबत मांडवा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्यानंतर फक्त पाचच आरोपीना पोलिसांनी अटक केली. इतर आरोपी अजूनही मोकाट असल्याने जखमी तरुण–तरुणी असुरक्षिततेच्या छायेत आहेत. या प्रकरणी तरुणीची आई सपना वारगे यांच्यासह मी अलिबागकर ग्रुपच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ महेंद्र कल्याणकर, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या संपर्क साधत या प्रकरणी कारवाईचे निर्देश दिले.

अशोक वारगे, विक्रांत वार्डे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने हे निवेदन दिले आहे. या निवेदनानुसार संपूर्ण राज्यात महिलांवर होणाऱ्या अत्याचारांत दिवसेंदिवस वाढ होत आहे. महिला अत्याचारासंदर्भातील गुन्हे कमी होत नाही. रायगड जिल्हादेखील या गोष्टीत मागे राहिलेला नाही हेच या घटनेवरून स्पष्ट झाले आहे. सर्व आरोपींवर कडक कारवाई झाली आहे.

# कवितासंग्रहाचे माणगावात प्रकाशन

**माणगाव : प्रतिनिधी**

कोमसापच्या माणगाव शाखेच्या अध्यक्षा सायराबानू वजीर चौगुले यांच्या 'चांदणं शब्दांचं' या पहिल्या कवितासंग्रहाचे प्रकाशन नुकताच प्रसिद्ध कवयित्री फरजाना इकबाल यांच्या हस्ते करण्यात आले. मनातला संवेदनशीलतेचा झरा कायम जिवंत ठेवला तरच आपण सतत लिहू शकतो, असे प्रतिपादन फरजाना इकबाल यांनी या वेळी केले.

कोमसाप माणगाव शाखेच्या उपाध्यक्ष श्रद्धा भिडे यांनी प्रास्ताविकात शाखेच्या वाटचालीचा आढावा घेतला. राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे सदस्य एल. बी. पाटील, अ. वि. जंगम यांनी मनोगत व्यक्त केले. माणगाव शाखेतील सदस्यांनी चांदणं शब्दांच या काव्यसंग्रहातील पाच कवितांचे वाचन केले. या वेळी नीता सखाराम करकरे (नूतन माध्यमिक विद्यालय, खरवली) आणि दिगंबर अडीत (प्राथमिक शाळा, विळे धनगरवाडा) यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कवी अजित शेडगे व कवयित्री अपूर्वा जंगम यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कोमसापचे दक्षिण जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ, सुधीर शेठ, सुरेखा दांडेकर, ज्योती बुटाला, नृत्यशिक्षिका विद्या कदम, हेमंत बारटक्के, संध्या दिवकर, सदानंद ठाकूर, सीमा रिसबुड, शीतल मालुसरे आदी या वेळी उपस्थित होते. कवी रामजी कदम यांनी आभार मानले.



(छाया : सलीम शेख)

# सबका साथ... सबका विश्वास... आणि सबका प्रयास...!

## भारताच्या अभूतपूर्व विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींची २० वर्षे

सुमारे आठ वर्षांपूर्वी भारतामध्ये अभूतपूर्वक क्रांती घडली आणि अनेक दशके काँग्रेसच्या राजकारणामुळे वैतागलेल्या भारतीय जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हातात देशाची सूत्रे सुपूर्द केली. त्याच क्षणापासून नव्या भारताचा उदय झाला.

सन २०१४ मध्ये 'अब की बार मोदी सरकार' या घोषणेने संपूर्ण भारताने मान्य केले की आता येणार तर मोदीजी, ही घोषवाक्य काळ्या दगडावरची रेघ होती. नरेंद्र मोदी २०१४ला भारतीय लोकशाहीच्या वतीने देशाचे पंतप्रधान म्हणून विराजमान झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ७ ऑक्टोबर २०२१ रोजी मुख्यमंत्री व देशाचे पंतप्रधान या नात्याने जनसेवक म्हणून २० वर्षे पूर्ण करीत आहेत. ७ ऑक्टोबर २००१ रोजी नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री झाले आणि २०१४ला देशाचे पंतप्रधान झाल्यानंतर संसदेत जाऊन देशाचा कारभार चालणार आहे त्या संसद भवनाला नमन केले.

मोदी यांनी सांगितले, भारताची भूमी ही लोकशाहीची मातृभूमी आहे. आज ७ ऑक्टोबरला मोदींच्या विकासपर्व योजनांच्या कार्याला २० वर्षे पूर्ण होत आहेत. म्हणून देशभरात 'सेवा व समर्पण' अभियान राबविण्यात येत आहे. नुकत्याच आपल्या भारत देशाचा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला गेला. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशाची सूत्रे स्वीकारल्यानंतर सर्वप्रथम देशभरात स्वच्छता सुरू केली. पंतप्रधानांचे हे सर्वंकष स्वच्छता अभियान होते.

मोदींनी तळागाळातील सर्वसामान्य जनतेसाठी नवनवीन योजना आणल्या. त्यापैकी भारत स्वच्छता योजना, उज्ज्वला योजना, पीएम पोषण योजना, आयुष्यमान भारत योजना, अमृत पेयजल योजना, पंतप्रधान आवास योजना, किसान–कृषी योजना, अटल योजना, हर घर जल योजना, भारतात १० कोटींहून अधिक स्वच्छतागृह उभी राहिली. हजारो गावे हागणदारीमुक्त झाली. गोरगरीब जनतेला पीएम योजनेमुळे आपली हक्काची घरे मिळाली. अशा अनेक योजना मोदींनी जनतेसाठी आणल्या आहेत.



प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना, पीएम केअर्स योजना अशा अनेक योजना आहेत. या योजना आधुनिक नवभारताच्या उभारणीसाठी आवश्यक होत्या. आत्मनिर्भर भारत बनविण्याचे मोदींचे स्वप्न सत्यात उतरत आहे. लोकल फॉर व्होकल देशाला प्रगतशील मार्गाकडे मोदींनी कूच केली आहे. समाजाची, देशाची सेवा करण्यासाठी मोदींनी स्वतःला वाहून घेतले आहे.

देशातील प्रत्येक घटकातील विकासकार्यामुळे देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यात मदत होते. दिवसेंदिवस आपला देश प्रगती करीत आहे. कोरोना महामारीने संपूर्ण जगासमोर मोठे संकट आले. अशा परिस्थितीत भारतीय लोकसंख्येचा विचार करता आपल्या देशावर त्याचा मोठा परिणाम झाला असता, परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे योग्य निर्णय आणि उपाययोजनांनी कोरोनाच्या संकटकाळातही देशाला सावरले. कोरोनाच्या काळात सर्वप्रथम नरेंद्र मोदी यांचे योग्य निर्णय आणि उपाययोजनांनी कोरोनाच्या संकटकाळातही देशाला सावरले.

कोरोनाच्या काळात सर्वप्रथम नरेंद्र मोदींनी देशाचा विचार करीत कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यावर भर दिला. देशातील नागरिकांना मोफत लस देण्यासाठी त्यांनी ३५ हजार कोटी रुपये केंद्र सरकारच्या माध्यमातून दिले. आणि आपला भारत ८९ कोटी लसीकरण करणारा अव्वल देश ठरला आहे. आरोग्याच्या दृष्टीने देशात मेडिकल कॉलेजचे प्रमाण वाढले. एकेकाळी सहा एम्स होत्या. पण मोदींच्या दूरदृष्टीतून २२ एम्स निर्माण झाल्या. दिवसेंदिवस आपला देश प्रगती करीत आहे. नवभारताच्या पावलावर पाऊल ठेवत आत्मनिर्भर भारत उदयाला येत आहे. हे मोदींच्या विकासाच्या प्रचंड दूरदृष्टीतून होत आहे. गुजरात राज्याच्या मुख्यमंत्रीपासून भारताच्या पंतप्रधानपर्यंत यशस्वी झेप घेत असताना नवभारत उभा राहत आहे. मुख्यमंत्री ते पंतप्रधान या २० वर्षाच्या कार्याला, विकासाच्या गंगेला, देशहितासाठी नवनवीन योजनेला, समर्पित देशासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे योगदान मोठे आहे. असेच विकासकार्य चालू राहावे. आपल्या भारत देशाचे नाव जगामध्ये उच्चांक स्थितीत उभे राहावे. सेवा व समर्पण कार्यात मोदींच्या कार्याचा हा लेखाजोखा मांडला आहे. पुढील देशकार्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींना कोटी–कोटी शुभेच्छा!

**–प्रशांत शां. म्हशीलकर,**
सावळे, रसायनी

# कर्जत तालुक्यातील रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत भाजपचे आंदोलन



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्याबाबत कर्जत तालुका भाजप आक्रमक झाला आहे. शहरातील लो. टिळक चौकात तालुक्यातील खराब रस्त्यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन मांडून कर्जत भाजपने बुधवारी (दि. ६) आंदोलन केले. या आंदोलनाच्या निमित्ताने सार्वजनिक बांधकाम खाते आणि जिल्हा परिषद बांधकाम खाते यांना भापने जाब विचारला.

कर्जत तालुक्यातील नेरळ–ममदापूर–भडवळ, नेरळ–कळंब, नेरळ–कशेळे, कळंब–पाषाणे, कर्जत–कोंडीवडे, नेरळ पेशवाई रोड आणि चिंचवली–कडाव या रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. या रस्त्यांवरून प्रवास करताना वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्याबाबत कर्जत तालुका भारतीय जनता पक्षाच्या वतीने बुधवारी आंदोलन करण्यात आले.

कर्जत तालुक्यातील रस्त्यांची स्थिती दाखविणारे छायाचित्र प्रदर्शन कर्जत शहरातील लोकमान्य टिळक चौकात लावण्यात आले. भाजपचे रायगड जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, भाजप किसान मोर्चा कोकण संघटक सुनील गोगटे, कर्जत तालुका सरचिटणीस राजेश भगत, शहर अध्यक्ष बळवंत घुमरे, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, भाजप नेरळ जिल्हा परिषद गटाचे अध्यक्ष संदीप म्हसकर आदी या वेळी उपस्थित होते.

खड्डेमय रस्त्यांच्या चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन केल्यानंतर जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे यांनी कर्जत तालुक्यातील खराब रस्त्यांना हे राज्य सरकार अवलंबून असून सर्व रस्ते खड्डेमय झाल्याने रस्त्यावरून प्रवास करणाऱ्यांच्या शरीराचा खुळखुळा झाला आहे. पाठीच्या आजारांनी वाहनचालक त्रस्त झाले असून, शासनाला जागे करण्यासाठी हे आंदोलन आहे, असे जाहीर केले.

शासनाने सार्वजनिक बांधकाम विभागाला आदेश देऊन या खड्डेमय रस्त्यांची दुरुस्ती करावी, अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरून अनेक ठिकाणी आंदोलने करू असा इशारा भाजपचे जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे यांनी या वेळी दिला.

---

### रस्त्याच्या मागणीकडे दुर्लक्ष करणाऱ्या

## राजिप प्रशासनाचे आदिवासी, धनगर बांधवांनी घातले श्राद्ध

**अलिबाग : प्रतिनिधी**

रस्ता बनवून द्यावा या मागणीकडे दुर्लक्ष करणाऱ्या रायगड जिल्हा परिषद (राजिप) प्रशासनाचे बुधवारी (दि. ६) खालापूर तालुक्यातील करंबेळी ठाकूरवाडी, खडई धनगरवाडा येथील आदिवासी व धनगर बांधवांनी सर्वपित्री अमावस्येला श्राद्ध घालून निषेध केला.

खालापूर तालुक्यातील करंबेळी ठाकूरवाडी व खडई धनगरवाडा येथील ग्रामस्थ गेली अनेक वर्षे गावातील रस्त्यासाठी पाठपुरावा करीत आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे अस्तित्वातच नसलेल्या रस्त्याला जिल्हा ग्रामीण मार्गाचा दर्जा देण्यात आला आहे. हरवलेला रस्ता शोधून द्या, या मागणीसाठी तसेच प्रशासनाचा निषेध करण्यासाठी या गावांमधील ग्रामस्थांनी आपल्या पोराबाळांसह बुधवारी जिल्हा परिषद कार्यालयावर मोर्चा काढला. संतापलेल्या मोर्चेकऱ्यांनी जिल्हा परिषद प्रशासनाचे श्राध्द घालून आपल्या भावना व्यक्त केल्या.

अलिबाग येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळून मोर्चाला सुरवात झाली. एसटी स्थानक, महावीर चौक, बालाजी नाका, मारूती नाका मार्गे हा मोर्चा पोस्ट ऑफीसजवळ दाखल झाला. तिथे तो पोलिसांनी अडविला.या मोर्चात संतोष ठाकूर, संतोष घाटे, उदय गावंड, जयेश शिंदे, अंकुश माडे, यशवंत माडे, सुनिल घाटे, पांडू हिरवा, शुभम माडे, बबलू घाटे, नारायण विर, चंद्रकांत ढेबे आदि सहभागी झाले होते.

राजिप बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता भारदेस्कर यांनी मोर्चाला सामोरे जात निवेदन स्वीकारले. ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते, खडई ग्रामस्थ, करंबेळी ग्रामस्थ, आणि जिल्हा ग्रामीण मार्ग क्र.१३२ शी संबंधित शेतकऱ्यांची बैठक १४ ऑक्टोबर रोजी खालापूर पंचायत समिती कार्यालयात आयोजित करण्यात येईल, असे असे आश्वासन भारदेस्कर यांनी मोर्चेकऱ्यांना या वेळी दिले.






---

## वीज पडून खांडस गावातील शेतकरी जखमी

**मंदिराचेही नुकसान**

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील खांडस गावातील हिरामण मारूती ऐनकर या शेतकऱ्याच्या अंगावर मंगळवारी (दि. ५) संध्याकाळी वीज पडली. त्यात ते गंभीर जखमी झाले आहेत. त्याचवेळी तेथील विठ्ठल रखुमाई मंदिरावरही वीज पडली, त्यात मंदिराचा काही भाग कोसळून नुकसान झाले आहे.



खांडस गावातील हिरामण ऐनकर आणि त्याचा भाऊ पंढरीनाथ ऐनकर हे गावापासून १०० मीटर अंतरावरील आपल्या शेतात गुरे घेऊन गेले होते. मंगळवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास त्या भागात विजांचा लखलखाट आणि ढगांच्या गडगडाटासह पाऊस सुरू झाला. यावेळी हिरामण यांच्या वीज कोसळली. त्यात ते भाजले गेले. त्यांना तात्काळ खांडस येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. खांडस गावात असलेल्या विठ्ठल रखुमाई मंदिरावरही वीज पडली. त्यात मंदिराचे मोठे नुकसान झाले. मात्र कोणताही जीवीतहानी झालेली नाही.

---

## सुधागडात भात खरेदी केंद्र सुरू करा

### पाली तहसीलदारांना निवेदन

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील भात खरेदी केंद्र ताबडतोब सुरू करावेत, अशी मागणी मनसेने केली आहे. या मागणीचे निवेदन तहसीलदार दिलीप रायण्णावार यांना देण्यात आले.

साधारण दसऱ्यापर्यंत भात तयार होतो. मात्र भात खरेदी केंद्र दिवाळीनंतर सुरू होतात. त्यामुळे दिवाळी सणाला शेतकऱ्यांच्या हाती पैसे नसतात. परिणामी नाईलाजाने शेतकऱ्यांना आपले भात व्यापाऱ्यांना कमी किंमतीत विकावे लागते. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. म्हणून लवकर भात खरेदी केंद्र सुरू करण्यात यावेत, असे निवेदनात म्हटले आहे. तहसीलदारांना निवेदन देतेवेळी मनसे तालुका अध्यक्ष सुनिल साठे, केवल चव्हाण, ह.भ.प. महेश पोंगडे महाराज, शेखर चव्हाण, परेश वनगले व समीर लोंढे आदी उपस्थित होते.

---

(छाया : विनायक माडपे)






## एक्स्प्रेस वेवर दोन चालकांचा मृत्यू

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई– पुणे एक्स्प्रेस वेवर बुधवारी (दि. ६) सकाळी आठ ते नऊ वाजण्याच्या सुमारास घडलेल्या दोन वेगवेगळ्या घटनेत दोन चालकांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. यात एक टेम्पो व एक ट्रक चालक आहे. पुढील वाहनास धडक दिल्याने जबर जखमी होऊन टेम्पोचालकाचा तर ट्रक टर्मिनलमध्ये विश्रांती घेण्यासाठी थांबला असताना ट्रकचालकाचा झोपेत मृत्यू झाला असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

एक्स्प्रेस वेवर किलोमीटर ३६:५०० मुंबई लेनवर बुधवारी सकाळी पुढच्या ट्रकला एक टेम्पो पाठिमागून धडकला. यात टेम्पो चालक रहेमान मनाल शेख (वय ४१, रा. मुंबई) हा गंभीर जखमी अवस्थेत अडकून पडला होता. खूप मेहनतीनंतर टेम्पो चालकाला बाहेर काढण्यात यश मिळाले, मात्र या दरम्यान त्या चालकाचा मृत्यू झाला होता. आयआरबी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, महामार्ग पोलीस यंत्रणा, खोपोली पोलीस यंत्रणा, डेल्टा फोर्सचे जवान, लोकमान्य हॉस्पिटलच्या टीमने अडकलेल्या मृत चालकाला बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले.

दुसरी घटना एक्स्प्रेस वेवरील निशीसागर फूड मॉल जवळील ट्रक टर्मिनस येथे घडली. ट्रक विश्रांतीसाठी थांबला असताना ट्रकचालक तुलसीकुमार दोमोदरन (वय ४८, रा. तकलुपूर, कर्नाटक) हा केबिनमध्ये मृतावस्थेत आढळला. झोपेतच त्याचा मृत्यू झाला असण्याचा प्राथमिक अंदाज आहे.

---

## कर्जत सावेळे येथे वयोवृद्धाचा खून

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील सावेळे गावातील म्हशींच्या तबेल्यात काम करणाऱ्या वयोवृद्ध कामगाराचा मंगळवारी (दि. ५) मध्यरात्री मध्यरात्रीनंतर चार अज्ञात मारेकऱ्यांनी खून केला. या प्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सावेळे गावात आरिफ हाजीमिया मुल्ला यांचा म्हशीचा तबेला आहे. त्यांच्याकडे गणपत रावजी जाधव (वय ७५) हे अनेक वर्षांपासून कामगार म्हणून काम करीत होते. मंगळवारी मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास त्या तबेल्यावर चार अज्ञात इसम आले. त्यांनी तेथे झोपलेले आरिफ मुल्ला यांच्या अंगावर चादर टाकून तोंड आणि गळा दाबण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी आरडाओरडा करणाऱ्या गणपत जाधव यांच्या डोक्यावर त्या चौघांनी धारदार शस्त्रांनी प्रहार केला. त्यात ते जखमी झाले, तर हल्लेखोर पळून गेले. आरिफ यांचा मुलगा सादिक सकाळी तबेल्यावर पोहचला असता, त्याला त्याचे वडील आरिफ मुल्ला हे बेशुद्ध तर आणि कामगार गणपत जाधव हे रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे आढळले. त्या दोघांना बुधवारी सकाळी कर्जत उपजिल्हा रुग्णालयात आणले असता, गणपत जाधव यांचा मृत्यू झाला असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली, तर आरिफ मुल्ला यांच्यावर उपचार सुरू केले. अधिक तपास सुरू आहे.

---


सिडको
शहरांचे शिल्पकार

### शुद्धीपत्रक

मौजे करंजाडे, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील तक्त्यातील जमिनींचे संपादन करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ अन्वये जाहीर सूचना दिनांक ०३/०२/२०२१ रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती.

सदर जाहीर सूचनेमध्ये खालील तक्त्यातील रकाना क्र. ६ मध्ये नमूद संपादन करावयाच्या सर्व्हे नंबरचे क्षेत्र कमी करण्यात आले असून रकाना क्रमांक ७ मध्ये नमूद क्षेत्र या शुध्दीपत्रकानुसार वाचावे.

| अ.क्र. | गावाचे नांव | तालुका | भूमापन क्रमांक | हिस्सा क्रमांक | दिनांक ०३/०२/२०२१ रोजीच्या सुचनेनुसार संपादन करावयाचे क्षेत्र (हे.आर) | | | शुद्धीपत्रकानुसार वाचावयाचे क्षेत्र (हे.आर) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | जिरायत | पो. ख. | एकूण | भूमापन क्रमांक | हिस्सा क्रमांक | एकूण क्षेत्र |
| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | | | ७ | |
| १ | करंजाडे | पनवेल | ६७ | ४/अ | ०–३६–५० | ०–०३–५० | ०–४०–०० | | | |
| २ | करंजाडे | पनवेल | ६७ | ४/अ | १–९६–५० | ०–०३–५० | २–००–०० | | | |
| ३ | करंजाडे | पनवेल | ६७ | ४/अ | १–८०–९० | ०–०३–५० | १–८४–४ | ६७ | ४अ पैकी | ४–६४–० |
| ४ | करंजाडे | पनवेल | ६७ | ४/अ | ०–४२–५० | ०–०३–५० | ०–४६–० | | | |
| ५ | करंजाडे | पनवेल | ६७ | ४/अ | १–४४–४० | ०–००–०० | १–४४–४ | | | |
| ६ | करंजाडे | पनवेल | ६७ | ४/ब | ३–९३–०० | ०–१३–०० | ४–०६–०० | | | |
| ७ | करंजाडे | पनवेल | ६७ | ४/ब | ०–४०–०० | ०–००–०० | ०–४०–०० | ६७ | ४/ब पैकी | ३–४१–० |
| ८ | करंजाडे | पनवेल | ६७ | ४/ब | ०–४०–०० | ०–००–०० | ०–४०–०० | | | |
| ९ | करंजाडे | पनवेल | ६७ | ४/ब | ०–४०–०० | ०–००–०० | ०–४०–०० | | | |
| १० | करंजाडे | पनवेल | ६७ | ५ | ०–४३–७० | ०–०१–०० | ०–४४–७० | ६७ | ५ | ०–६७–० |
| ११ | करंजाडे | पनवेल | ६७ | ५ | ०–२२–३० | ०–००–०० | ०–२२–३० | | | |
| १२ | करंजाडे | पनवेल | ६७ | ६ | ०–९८–०० | ०–०१–०० | ०–९९–०० | ६७ | ६ पैकी | ०–८२–० |

**(सतिशकुमार खडके)**
अपर जिल्हाधिकारी तथा
मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), सिडको
सिडको/जनसंपर्क/२९५(अ)/२०२१–२२

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in



### जाहिरात
### जिल्हा रुणालय रायगड अलिबाग
### जनरल नर्सिंग (तीन वर्षे) प्रशिक्षण प्रवेश

जिल्हा रुग्णालय रायगड अलिबाग येथे दिनांक १५.११.२०२१ पासून सुरु होणाऱ्या तीन वर्षाच्या जनरल नर्सिंग मिडवाईफरी प्रशिक्षणासाठी फक्त रायगड जिल्ह्यातील, खालील अटी व शर्तीनुसार इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत.

**१) एकूण जागा :–** २० जागा (१८ स्त्री उमेदवार व २ पुरुष उमेदवार)
मा. उपसंचालक (शुश्रुषा) आरोग्य सेवा, आरोग्य भवन, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेले अनुशेष.

**अनुशेष व प्रवर्ग**

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ. | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | आर्थिक दुर्बल घटक | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १ | ० | ० | १ | १ | १ | ४ | २ | ७ | २० |

**२) वयोमर्यादा :–** दि. ३०/०९/२०२१ रोजी उमेदवाराचे वय १७ वर्षापेक्षा कमी व ३५ वर्षापेक्षा जास्त असू नये. (इतर विशेष सवलत नाही.)

**३) शैक्षणिक पात्रता :–**

- उमेदवार महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाची उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा १२वी (१०+२) अथवा समतुल्य परीक्षा शासनमान्य संस्थेकडून प्राधान्याने फिजीक्स, केमेस्ट्री व बायोलॉजी या शास्त्र विषयांसह कमीत कमी ४० टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. मात्र मागासवर्गीय गटातील उमेदवारांच्या बाबतीत ३५ टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
- वरीलप्रमाणे आवश्यक पात्रता (विज्ञान शाखेची) धारण करणारे उमेदवार पुरेशा संख्येने उपलब्ध न झाल्यास महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाची, कोणत्याही शाखेतील कोणतेही विषय घेऊन उच्च माध्यमिक परीक्षा (१०+२) कमीत कमी ४० टक्के गुणांनी उत्तीर्ण करणाऱ्या खुल्या गटातील उमेदवारांचा व कमीत कमी ३५ टक्के गुणांनी उत्तीर्ण करणाऱ्या मागासवर्गीय उमेदवारांचा प्रवेशासाठी विचार करण्यात येईल.
- इंडियन नर्सिंग कॉन्सिलच्या पत्र क्र.एफ.नं. १–५/२०१८ आयएनसी दि. १९/०४/२०१९च्या परिपत्रकानुसार "For Disabled Candidates : 5% Disability of locomotor to the tune of 40% to 50% of the lower extremity". या अपंग आरक्षणानुसार कार्यवाही करण्यात येईल.
- एएनएम प्रशिक्षण उत्तीर्ण उमेदवारांसाठी ५ टक्के जागा राखीव राहतील.

**४) अभ्यासक्रमाचा कालावधी व वसतीगृह सुविधा :**
३ वर्ष (प्रशिक्षण कालावधीत महिला उमेदवारास उपलब्धतेनुसार शासकिय वसतीगृहात राहण्याची सोय मोफत करण्यात येईल. परंतु प्रथमवर्ष प्रवेशित उमेदवारांना त्यांच्या व पालकांच्या संमतीने वसतीगृहात राहणे बंधनकारक राहणार नाही. तसेच पुरुष उमेदवारास राहण्याची व जेवणाची सोय स्वतः करावयाची आहे.)

**५) विद्यावेतन :–** निवड झालेल्या प्रशिक्षणार्थीना शासन नियमाप्रमाणे अनुज्ञेय असलेले विद्यावेतन दरमहा दिले जाईल.

**६) प्रवेश अर्ज व शुल्क :–** खुल्या प्रवर्गासाठी रु. ५००/– व मागासवर्गीयांसाठी रु. २५०/– असे आहे.
निवड झालेल्या उमेवारांना भोजन खर्च, पुस्तके, स्टेशनरी, गणवेश इत्यादी खर्च स्वतः करावा लागेल. परीक्षा शुल्क, संलग्नता शुल्क (Enrollment), एसएनए

**७) प्रशिक्षणाचे ठिकाण :–** परिचर्या प्रशिक्षण केंद्र, जिल्हा रुग्णालय रायगड अलिबाग

८) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

**९) प्रवेशप्रक्रियेचे वेळापत्रक :**

| अ.क्र. | घटक | कालावधी |
|---|---|---|
| १ | प्रवेशप्रक्रिया सन २०२१–२२ बाबत जाहिरात देणे दिनांक | दि. ०२/१०/२०२१ ते ०६/१०/२०२१ |
| २ | प्रवेश अर्ज वाटप कालावधी | दि. ०७/१०/२०२१ ते १४/१०/२०२१ |
| ३ | प्रवेश अर्ज स्विकारणे | दि. ०८/१०/२०२१ ते २०/१०/२०२१ |
| ४ | प्रवेश अर्ज छाननी | दि. २१/१०/२०२१ ते २३/१०/२०२१ |
| ५ | गुणवत्ता यादी व मुलाखत यादी तयार करणे व प्रसिद्ध करणे | दि. २५/१०/२०२१ |
| ६ | गुणवत्ता यादीप्रमाणे मूळ प्रमाणपत्राची पडताळणी/समुपदेशन करणे | दि. २७/१०/२०२१ |
| ७ | निवड यादी प्रसिद्ध करणे व निवडपत्र देणे | दि. ०९/११/२०२१ ते दि. १०/११/२०२१ |
| ८ | एएनएम व जीएनएस प्रशिक्षण वर्ग सुरु करणे | दि. १५/११/२०२१ |

**१०)** निवड झालेल्या उमेदवारांना कागद पडताळणी करीता सादर करावयाची कागदपत्रे :

- शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला. (१२ वी)
- १० वी व १२ वी उत्तीर्णतेची गुणपत्रिका
- १० वी व १२ वी उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र
- महाविद्यालयाकडून प्राप्त १२ वी पास प्रयत्न प्रमाणपत्र (Attempt Certificate)
- जातीचा दाखला
- वय, अधिवास व राष्ट्रीयत्व दाखला
- नॉनक्रिमीलेअर सर्टीफिकेट
- विवाहीत असल्यास पतीचे संमतीपत्र
- आधार कार्ड
- शासकिय रुग्णालयातील सक्षम वैद्यकीय अधिकारी यांनी प्रमाणित केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र

**११) विद्यार्थ्यांचे स्थानांतर :–** एका संस्थेत प्रवेश दिल्यानंतर प्रशिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना दुसऱ्या संस्थेत स्थानांतर करता येणार नाही.

**१२) शिस्त व वर्तणूक प्रतिज्ञापत्र :–** निवड झालेल्या उमेदवारांना प्रवेशाच्यावेळी नियमांचे काटेकोरपणे पालन होईल अशा अर्थाचे प्रतिज्ञापत्राचा नमुना देण्यात येईल. त्या नमुन्यानुसार सदर उमेदवाराने रुपये १००/– च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज केलेले प्रतिज्ञापत्र तयार करून परिचर्या प्रशिक्षण विद्यालयात सादर करावे लागेल.

**१३)** निवड झालेल्या उमेदवारांनी परिचारिका प्रशिक्षण विभाग, जिल्हा रुग्णालय, अलिबाग, जि. रायगड येथे कागदपत्र पडताळणीस येताना सर्व मूळ प्रमाणपत्रासह स्वखर्चाने यावे, त्यासाठी कोणताही भत्ता दिला जाणार नाही. यावेळी सर्व प्रमाणपत्रांच्या मूळ प्रतीची छाननी करण्यात येईल.

**१४)** एकदा प्रवेशीत झालेली विद्यार्थीनी प्रशिक्षणासाठी निवड झाल्यानंतर १५ दिवसात कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षण सोडून गेल्यास रु. १००००/– इतकी रक्कम वसूल करण्यात येईल.

**सही/–**
**जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड**
**अलिबाग**

**विमाका/कोवि/२०२१–२०२२/१७३**

आयपीएलचा रनसंग्राम

आजचे सामने
- चेन्नई वि. पंजाब (दु. ३.३० वा., दुबई)
- कोलकाता वि. राजस्थान (सायं. ७.३० वा., शारजा)

# मुंबईचा दणदणीत विजय

## दारुण पराभवामुळे राजस्थानपुढे बाद फेरीचे आव्हान कठीण

**शारजा : वृत्तसंस्था**

नॅथन कुल्टर-नाइल (४/१४), जेम्स नीशाम (३/१२) यांच्या भेदक वेगवान गोलंदाजीला इशान किशनच्या (२५ चेंडूंत नाबाद ५० धावा) धडाकेबाज अर्धशतकाची साथ लाभल्यामुळे मुंबई इंडियन्सने इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेटमध्ये मंगळवारी राजस्थान रॉयल्सवर आठ गडी आणि ७० चेंडू राखून दणदणीत विजय मिळविला. राजस्थानने दिलेले ९१ धावांचे माफक लक्ष्य मुंबईने अवघ्या ८.२ षटकांत गाठले.



किशनने सूर गवसल्याचे संकेत देत षटकार लगावून मुंबईच्या सहाव्या विजयावर मोहोर उमटवली. कर्णधार रोहित शर्मा (२२) आणि सूर्यकुमार यादवने (१३) त्याला उत्तम साथ दिली. या विजयामुळे मुंबईने गुणतालिकेत पाचवे स्थान पटकावले असून त्यांची निव्वळ धावगतीसुद्धा सुधारली. आता शुक्रवारी सनरायजर्स हैदराबादविरुद्ध होणाऱ्या अखेरच्या साखळी लढतीत त्यांनी सरशी साधणे गरजेचे आहे. राजस्थानला मात्र कोलकाता नाइट रायडर्सला मोठ्या फरकाने पराभूत करावे लागेल.

तत्पूर्वी प्रथम फलंदाजी करताना राजस्थानला २० षटकांत अवघ्या ९ बाद ९० धावा करता आल्या. २७ धावांवर पहिला बळी गमावल्यानंतर राजस्थानची घसरगुंडी उडाली. कुल्टर-नाइलने यशस्वी जैस्वाल (१२), ग्लेन फिलिप्स (४), डेव्हिड मिलर (१५) आणि चेतन साकारिया (६) यांचे बळी मिळवताना आयपीएल कारकीर्दीतील सर्वोत्तम कामगिरीची नोंद केली, तर नीशामने संजू सॅमसन (३), शिवम दुबे (३) या धोकादायक फलंदाजांना माघारी पाठवले.

**संक्षिप्त धावफलक**

राजस्थान रॉयल्स : २० षटकांत ९ बाद ९० (एव्हिन लेविस २४; नॅथन कुल्टर-नाइल ४/१४, जेम्स नीशाम ३/१२) पराभूत वि. मुंबई इंडियन्स : ८.२ षटकांत २ बाद ९४ (इशान किशन नाबाद ५०, रोहित शर्मा २२; मुस्तफिजूर रेहमान १/३२).

## आयपीएल निवृत्तीसंदर्भात धोनीने केली घोषणा

### अखेरचा सामना पुढील वर्षी चेपॉक स्टेडियमवर खेळणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



चेन्नई सुपर किंग्जचा कर्णधार महेंद्रसिंह धोनीने पुढील वर्षीचा आयपीएल हंगाम खेळून निवृत्ती घेणार असल्याचे स्पष्ट केले आहे. आयपीएल कारकीर्दीतील अखेरचा सामना तो चेपॉक स्टेडियमवर खेळणार आहे. एका ऑनलाइन कार्यक्रमात तो बोलत होता.

धोनी म्हणाला, निरोपाचा सामना पाहण्याची संधी चाहत्यांना नक्की मिळेल. २०२२च्या हंगामात चेपॉकवर क्रिकेटरसिकांच्या साक्षीने मी अखेरचा सामना खेळेन.

धोनीच्या नेतृत्वाखाली ११ वेळा चेन्नई सुपर किंग्जने प्लेऑफपर्यंत मजल मारली आहे. ४० वर्षीय धोनीने आतापर्यंत चेन्नई संघाने खेळलेल्या सर्वच आयपीएलच्या पर्वांमध्ये संघाचे नेतृत्व केले आहे. धोनी हा आयपीएलमधील सर्वांत यशस्वी कर्णधारांपैकी एक म्हणून गणला जातो.

## आरोग्य प्रहर

### मखाना खाण्याचे फायदे

मखाना म्हणजे कमळाच्या बिया. ज्यामध्ये कॅलरीजची मात्रा अधिक आहे. मखानामध्ये पोषक तत्वे सर्वाधिक आहेत. मखाना खाल्याने सर्वाधिक फायदा होईल. हेल्थलाईनच्या बातमीनुसार, मखानामध्ये अनेक प्रकारचे अँटीऑक्सिडंट्स आढळतात म्हणजेच फॉक्स नट आणि ते किडनीसह तुमच्या हृदयाच्या आरोग्यासाठी चांगले आहे. मधुमेहाच्या रुग्णांसाठीही मखाना फायदेशीर मानला जातो. ते खाल्ल्याने शारीरिक कमजोरी दूर होते आणि शरीरात ऊर्जा येते.



✻ **कोलेस्ट्रॉल लेवल** – कॅल्शियम, मॅग्नेशियम, प्रथिने, कार्बोहायड्रेट, निरोगी चरबी, सोडियम, फॉस्फरस, लोह, व्हिटॅमिन-बी सारखी पोषक द्रव्ये माखनामध्ये चांगल्या प्रमाणात आढळतात. हे तुमच्या हाडांचे आरोग्य तसेच रक्तदाब योग्य ठेवते. फॉक्स नट्समध्ये असलेले पोषक घटक कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित ठेवतात. त्याच वेळी, त्यात असलेले मॅग्नेशियम शरीरातील चयापचय प्रक्रियेत मदत करते.

✻ **ऑक्सीडेटिव स्ट्रेस** – माखनामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स हानिकारक मुक्त रॅडिकल्स तयार होऊ देत नाहीत. हे शरीराला ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेसपासून वाचवते. एका अभ्यासानुसार, त्यात असलेले गॅलिक ॲसिड आणि क्लोरोजेनिक सिडसारखे अँटीऑक्सिडंट्स हृदयरोग, कर्करोग आणि टाइप २ मधुमेहाचा धोका कमी करतात.

✻ **ब्लड शुगर लेवल** – मखाना खाल्याने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित होण्यास मदत होते. अभ्यासानुसार, मखाना खाल्ल्याने, शरीरात अनेक प्रकारचे अँटीऑक्सिडेंट एंजाइम तयार होता. जे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवतात. तसेच इंसुलिनची पातळी सुधारते.

✻ **वजन कमी करण्यासाठी** – फॉक्स नट प्रथिने आणि फायबरने समृद्ध आहे. म्हणून त्याचे सेवन वजन कमी करण्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. प्रथिनांच्या प्रमाणामुळे, ते खाल्ल्यानंतर तुम्हाला वारंवार भूक लागत नाही. त्याचबरोबर त्यामध्ये असलेले फायबर पाचन तंत्रही मजबूत ठेवते.

✻ **ॲन्टी एजिंग** – मखाना म्हणजेच फॉक्स नट्समध्ये वृद्धत्व विरोधी गुणधर्म आहेत. अभ्यासानुसार, त्यात अशी अनेक संयुगे आढळतात.ज्यामुळे शरीरातील वृद्धत्वाचा प्रभाव कमी होतो. मखानामध्ये ग्लूटामाइन, सिस्टीन, आर्जिनिन सारख्या अमीनो ॲसिडचे प्रमाण असते. ज्यामुळे आपल्याला त्याच्या वृद्धत्वविरोधी गुणधर्मांचा लाभ मिळतो.

## प्रो कबड्डी लीगचा घुमणार दम

### आठवा हंगाम २२ डिसेंबरपासून बंगळुरूत




**मुंबई : प्रतिनिधी**

प्रो कबड्डी लीगचा आठवा हंगाम २२ डिसेंबरपासून बंगळुरूत सुरू होणार असून कोरोना साथीच्या पार्श्वभूमीवर प्रेक्षकांशिवाय हे सामने होणार आहेत.

मुंबईत २९ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत कबड्डीपटूंचा लिलाव झाल्यानंतर संयोजक मशाल स्पोर्ट्सने आठवा हंगाम एकाच ठिकाणी म्हणजे बंगळुरूत खेळवण्याचा निर्णय घेतला आहे. याआधीच्या हंगामात विविध संघांच्या यजमान शहरांत सामने व्हायचे. कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनीही प्रो कबड्डीसंदर्भातील निर्णयाचे स्वागत केले आहे.

याविषयी माहिती देताना प्रो कबड्डी लीगचे समन्वयक अनुपम गोस्वामी म्हणाले की, खेळाडू, स्पर्धेशी निगडित व्यक्तींच्या सुरक्षेला महत्त्व देत कोरोनाविषयक सरकारी मार्गदर्शक तत्त्वांआधारे बंगळुरू या एकाच शहरात जैव-सुरक्षित वातावरणात प्रो कबड्डी लीगचे आयोजन करण्यात येणार आहे.

## रायगडातील दोन जलतरणपटूंसह प्रशिक्षकाची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

### जलतरण संघटनेचे जिल्हाध्यक्ष परेश ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

४७व्या ज्युनियर व ७४व्या सिनिअर राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी पेणमधील अथर्व लोधी आणि महंत म्हात्रे या दोन खेळाडूंची महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे. ही स्पर्धा कर्नाटकमधील बंगळुरू येथे होणार असून त्याबद्दल अथर्व आणि सिनिअर संघाच्या प्रशिक्षकपदी निवड झालेल्या पांडुरंग म्हात्रे यांचे रायगड जिल्हा जलतरण संघटनेचे अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी अभिनंदन केले आणि यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे या वेळी अथर्वला तीन हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली.



राष्ट्रीय जलतरण स्पर्धेच्या ज्युनियर गटात ५० मीटर फ्री स्टाइल व ५० मीटर ब्रेस्ट या दोन इव्हेंटसाठी अथर्व लोधी याची, तर सिनिअर राष्ट्रीय जलतरण स्पर्धेतील वॉटर पोलो या इव्हेंटसाठी महंत म्हात्रे याची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या सिनिअर संघाचे व्यवस्थापक म्हणून रायगड जिल्हा जलतरण संघटनेचे सचिव पांडुरंग म्हात्रे यांची निवड झाली आहे. जलतरण संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, उपाध्यक्ष व नगरसेवक नितीन पाटील यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. नगरसेवक अजय बहिरा, युवा नेते मयूरेश नेतकर उपस्थित होते.

## भारतीय हॉकी संघाची राष्ट्रकुल स्पर्धेतून माघार

### कोरोनामुळे निर्णय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पुढील वर्षी बर्मिंगहॅम येथे होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतून भारतीय हॉकी संघाने माघार घेतली आहे. कोरोनाची चिंता आणि ब्रिटनच्या भारतासंदर्भात विलगीकरण नियमातील भेदभावामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. ब्रिटनने पुढील महिन्यात भुवनेश्वरला होणाऱ्या 'एफआयएच' पुरुषांच्या कनिष्ठ विश्वचषक हॉकी स्पर्धेतून माघार घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर २४ तासांतच हॉकी इंडिया संघटनेने ही भूमिका घेतली आहे.



कोरोना साथीची चिंता आणि प्रवाशांसाठीचा १० दिवसांचा विलगीकरणाचा नियम अशी कारणे देत ब्रिटनने भारतामधील स्पर्धेत न खेळण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर 'हॉकी इंडिया'चे अध्यक्ष ग्यानेंद्रो निंगोमबाम यांनी संघटनेचा निर्णय भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे (आयओए) अध्यक्ष नरिंदर बात्रा यांना कळवला आहे.

बर्मिंगहॅममध्ये २८ जुलै ते ८ ऑगस्ट या कालावधीत राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा आणि हँगझोऊ येथे १० ते २५ सप्टेंबर या दरम्यान आशियाई क्रीडा स्पर्धा होणार आहेत. या दोन स्पर्धांमध्ये ३२ दिवसांचे अंतर आहे. ब्रिटनमध्ये कोरोनाची साथ झपाट्याने पसरली आहे. या परिस्थितीत राष्ट्रकुल स्पर्धेत भारताचा सहभाग जोखमीचा ठरेल, असे मत निंगोमबाम यांनी व्यक्त केले आहे.

## जागतिक बॉक्सिंग स्पर्धेसाठी लवलिनाची भारतीय संघात निवड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टोकियो ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या लवलिना बोरगोहेनला (६९ किलो) इस्तंबूल येथे डिसेंबरमध्ये होणाऱ्या महिलांच्या जागतिक बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारतीय संघात थेट स्थान दिले जाणार आहे.

हिसार येथे २१ ऑक्टोबरपासून राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. टोकियो ऑलिम्पिकमधील कामगिरीच्या आधारे लवलिनाला राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी न होण्याची सूट मिळाली आहे. राष्ट्रीय स्पर्धेमधील सुवर्णपदक विजेत्यांना भारतीय संघात स्थान मिळेल, अशी घोषणा भारतीय बॉक्सिंग महासंघाने आधीच केलेली आहे.

## रोहित शर्माचा भीमपराक्रम

### टी-२०मध्ये ४०० षटकार ठोकणारा पहिला भारतीय

**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० क्रिकेटमध्ये ४०० षटकार ठोकणारा रोहित शर्मा हा पहिला भारतीय फलंदाज बनला आहे. राजस्थानविरुद्धच्या सामन्यापूर्वी त्याच्या खात्यात ३९८ षटकार होते. राजस्थानविरुद्ध त्याने १३ चेंडूंत २२ धावा केल्या. यादरम्यान त्याने एक चौकार आणि दोन षटकार ठोकले. यासह दणदणीत विजय मिळवित मुंबईने आयपीएल २०२१च्या प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या आशा जिवंत ठेवल्या आहेत.



भारताच्या इतर खेळाडूंबद्दल बोलायचे झाले तर सुरेश रैना ३२५ षटकारांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम वेस्ट इंडिजच्या ख्रिस गेलच्या नावावर आहे. त्याने १०४२ षटकार ठोकले आहेत. १०००पेक्षा जास्त षटकार मारणारा तो जगातील एकमेव फलंदाज आहे.

दरम्यान, मुंबई इंडियन्सने राजस्थानविरुद्धचे लक्ष्य केवळ ८.२ षटकांत पूर्ण केले. आयपीएलमध्ये ७० किंवा अधिक चेंडू शिल्लक असताना दोनदा सामने जिंकणारा मुंबई एकमेव संघ बनला आहे. याआधी २००८मध्ये संघाने केकेआरला ८७ चेंडू शिल्लक ठेवून पराभूत केले होते. ६७ धावांवर कोलकाता संघ गारद झाला होता. मुंबईने ५.३ षटकांत लक्ष्य गाठले होते.



## धोनीच्या लेकीचा फोटो व्हायरल

**दुबई : वृत्तसंस्था**

दिल्ली कॅपिटल्सने चेन्नई सुपर किंग्जचा तीन गडी राखून पराभव करीत गुणतालिकेत अग्रस्थानी झेप घेतली. दिल्लीविरुद्ध झालेल्या सामन्यात चेन्नईचा विजय व्हावा यासाठी अनेक चाहते प्रार्थना करीत होते. प्रार्थना करणाऱ्यांमध्ये चेन्नईचा कर्णधार महेंद्रसिंह धोनीची लेक झिवादेखील होती. स्टँडमध्ये बसलेल्या झिवाचा हात जोडून प्रार्थना करतानाचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. चेन्नई जिंकावी यासाठीच झिवा प्रार्थना करीत असावी असे अनेक युजर्सनी म्हटले आहे. या सामन्यात चेन्नईचा पराभव झाला, पण झिवाचा हा फोटो सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला होता.

## राजस्थानच्या नावावर नकोसा विक्रम

**शारजा : वृत्तसंस्था**

मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात फलंदाजांनी केलेल्या सुमार कामगिरीमुळे राजस्थानने एक नकोसा विक्रम आपल्या नावावर केला आहे. यंदाच्या आयपीएलमध्ये २० षटकात सर्वांत नीचांकी धावसंख्येचा विक्रम राजस्थानच्या नावावर झाला आहे. यापूर्वी हा विक्रम रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या नावावर होता. कोलकाता नाइट रायडर्सविरुद्ध त्यांनी ९२ धावा केल्या होत्या.

आयपीएल २०२१च्या सामन्यात मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांनी धमाकेदार कामगिरी करीत राजस्थान रॉयल्सच्या फलंदाजांवर वर्चस्व राखले. नाणेफेक गमावलेल्या राजस्थानने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ९ बाद ९० धावा केल्या. मुंबईच्या जेम्स नीशाम, नॅथन कुल्टर नाईल आणि जसप्रीत बुमराह यांनी तिखट मारा करीत राजस्थानला चांगलाच लगाम घातला.



**आयपीएल २०२१मध्ये नीचांकी धावसंख्या**
- ९०/९ राजस्थान विरुद्ध मुंबई
- ९२ बंगळुरू विरुद्ध कोलकाता
- १०६/८ पंजाब विरुद्ध चेन्नई
- १११ मुंबई विरुद्ध बंगळुरू
- ११५/८ हैदराबाद विरुद्ध कोलकाता




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com